**The journal is indexed, peer reviewed and listed in UGC Care.**

SK Sharma

**Editor**

**Note:** This eCertificate is valid with published papers and the paper must be available online at the website under the network of EDUIndex. For cross check you can contact at editor@eduindex.org

Scanned with OKEN Scanner

Drishtikon
*(UGC Care Journal)*
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

# कृषी व ग्रामिण विकासावर जागतिकीकरणाचा परिणाम

**प्रा.डॉ.अरुण उखा पाटील**
अर्थशास्त्र विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय
अक्कलकुवा जि.नंदुरबार ( महाराष्ट्र ) -४२५४१५
arunpatil927@gmail.com

**गोषवारा (Abstract)**

जागतिकीकरण म्हणजे देशाची अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडणे होय. थेट विदेशी गुंतवणुकीला अर्थव्यवस्था खुली करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये विदेशी कंपन्यांना गुंतवणुक करण्यासाठी सवलत देणे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिन व्यवहारांवरील अडथळे व बंधने दुर करणे, परदेशात संयुक्त व्यवहार करण्याला उत्तेजन देणे, आयातीवरील परिणामकारक बंधने दुर करुन, त्याऐवजी आयातशुल्क आकारणे, निर्यातीला उत्तेजन देण्याच्या दृष्टीने वित्तीय दरात समायोजन करणे इत्यादी बाबींवर भर देणे होय. १ ९९ १ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्विकार केला आणि भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाकडे आकर्षित झाली. जागतिकीकरणाचा स्विकार केल्यानंतर भारताने त्याप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेत बदल केले. आयातीवरील संख्यात्मक निर्बंध दुर करण्याची अट जागतिकीकरणाच्या धोरणात समाविष्ट असल्यामुळे भारताने १९९१ पासून आयातीवरील निर्बंध कमी करण्यास सुरुवात केली. त्याचप्रमाणे परकीय भांडवलात बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्त प्रवेश देण्यात येऊ लागला.कृषी अनुदानावर कपात करण्यात आली. या बदलाचा मात्र सुरुवातीच्या काळात कृषी क्षेत्रावर विपरीत परीणाम झाला आहे. जागतिकीकरणामध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते . त्यामुळे नवनवीन तंत्रज्ञान, बी बीयाणे, रासायनिक खते, किटकनाशके, यंत्रसामुग्री इ.च्या माध्यमातून कृषी उत्पादनात निश्चितच वाढ झाली. शेतकऱ्यांचा, ग्रामीण जनतेचा दृष्टीकोन बदलला. परिणामत : आज भारतीय कृषी अन्नधान्य उत्पादन जवळपास ४०० दशलक्ष टनापर्यंत पोहोचले. असे असले तरी जागतिकीकरणामुळे भारतीय शेतीला फायदयापेक्षा तोटयाचाच जास्त सामना

Copyright©authors


Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

करावा लागला. जागतिकीकरण मुक्त व्यापार आणि खाजगीकरणामुळे कृषी आणि ग्रामीण विकासावर अनेक सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन्ही परिणाम झालेले दिसून येतात. जागतिकीकरण म्हणजे केवळ आधुनिकीकरण, औद्योगिकरण तसेच खाजगीकरण यामुळे होणारी जंगलतोड, तसेच त्यामुळे मातीची सुपिकता कमी होणे. त्यामुळे जैवविविधतेची होणारी हानी इ. समस्यांना सामोरे जावे लागले. जागतिकीकरणामुळे आधुनिक कृषी पध्दतीत केमिकल्स, किटकनाशके तसेच खतांचा वापर करण्यात आला. सिंचन सुविधा वाढल्या. अशा या प्रगत तंत्रज्ञानामुळे उत्पादनात वाढ झाली परंतु यामुळे गरीब शेतकऱ्यांना याचा फारच त्रास झाला. प्रगत तंत्रज्ञानाच्या जोरावर प्रगत राष्ट्रातील शेतकरी प्रचंड उत्पादन घेऊन ते बाजारपेठेत दाखल करून गरीन शेतक-यांचे आर्थिक गणित विस्कळीत करतात. दुसरीकडे वाढत्या औद्योगिकरणामुळे समाजातील लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. ग्रामिण भागातून शहरी भागात स्थलांतर वाढले. परंतु स्थलांतरीत कामगारांना परदेशी गुंतवणुकदार कमी पगार देऊन त्यांचे शोषण करतात. असे असले तरी जागतिकीकरणाच्या या प्रवाहात एखादया देशाने उर्वरित जगापासून वेगळे राहणे शक्य नाही. म्हजून जागतिक अर्थव्यवस्थेत समरस होण्याशिवाय पर्याय नाही. कारण आता जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली असून ती थांबविणे आता शक्य नाही.

सुचनक शब्द : ( Key Word)

आर्थिक सुधारणा काळ, खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, औद्योगिकीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्था, समस्या रोजगार, स्थलांतर इ.

प्रस्तावना : (Introduction)

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कृषी क्षेत्राला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. १९९१ मध्ये भारताने आर्थिक सुधारणांचा स्विकार केला आणि भारतीय अर्थव्यवस्थेत जागतिकीकरणाच्या प्रवाहाला सुरुवात झाली त्या बदलत्या प्रवाहानुसार भारत सरकारने त्याप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेत बदल केले. जागतिकीकरणाच्या धोरणात आयातीवरील संख्यात्मक निर्बंध दुर करण्याची अट घातली गेल्यामुळे १९९१ पासून भारताने आयातीवरील निर्बंध कमी करण्यास सुरवात केली. नंतरच्या काळात म्हणजे १९९६-९७ मध्ये ४८८ , १९९७-९८ मध्ये ३८१, १९९८-९९ मध्ये ८ ९ ४ याप्रमाणे १७६३ वस्तुंच्या आयातीवरील निर्बंध हटविण्यात येऊन सदर वस्तुंची आयात ही खुली करण्यात आली. त्यासोबतच परकीय भांडवलाअंतर्गत बहुराष्ट्रीय कंपन्यांना मुक्तपणे प्रवेश देण्यास सुरुवात झाली. परंतु सदर बदलांचे कृषो क्षेत्रावर अर्थातच ग्रामीण

Copyright©authors



Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, **May**-2020

अर्थव्यवस्थेवर सुरुवातीच्या काळात विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते. १९९१ नंतरच्या दशकात जागतिक अर्थव्यवस्थेत काही लक्षणीय बदल घडून आले या घडून आलेल्या बदलांना जागतिकीकरण असे नाव मिळाले व त्यामुळे बहुतेक सर्व देशाच्या अर्थव्यवस्था प्रभावित झाल्या. जगातील विविध राष्ट्रीय अर्थव्यवस्थाना परस्पर जोडणारी, त्याच्यामध्ये वस्तु-सेवा. भांडवल-तंत्रज्ञान, श्रम यांचा मुक्त प्रवाह सुरु राहण्याच्या प्रक्रियेला जागतिकीकरण असे म्हणतात. खरे पाहता ऍडम स्मिथ यांच्या काळापासून मुक्त व्यापारापासून होणाऱ्या लाभांचा जो स्वयंस्फूर्तपणे पुरस्कार केला जात होता त्याचेच सुधारित व आधुनिक रुप म्हणजेच जागतिकीकरण असे म्हणता येईल. या मुक्त व्यापाराच्या पुरस्कारामध्ये तत्कालिन वसाहतवादी राष्ट्रांचा स्वार्थ होता. तर आजच्या काळातील जागतिकीकरणामागे निवडक विकसीत देशांचे आर्थिक हितसंबंध आहेत. त्यावेळी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची फारशी प्रगती झालेली नहोती. अलिकडील जागतिकीकरणाच्या क्रातीमुळे सर्व संदर्भच बदलले असून संपूर्ण जग अतिशय जवळ आले आहे .साहजिक जागतिकीकरणाची व्याप्ती मोठी आहे . त्यातूनच विश्वग्राम (Global Village) ही संकल्पना पुढे आली . प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणामुळे कृषी आणि ग्रामीण विकासावर झालेले परिणाम, आर्थिक सुधारणा काळानंतर भारतातील शेतीची स्थिती , भारतीय कृषी क्षेत्रासमोर असलेल्या अडचणी, सध्या च्या स्थितीतील आव्हाने, निष्कर्ष उपाययोजना इत्यादी बाबींचा आढावा घेण्यात आलेला आहे.

* संशोधन विषयाचे उददेश (Objectives)

प्रस्तुत शोधानबंध लिखाणाचे उददेश पुढील प्रमाणे आहेत.

१) जागतिकीकरणामुळे कृषी आणि ग्रामीण विकासावर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

२) आर्थिक सुधारणा काळानंतर भारतातील कृषी क्षेत्राची स्थिती अभ्यासणे.

३) भारतीय कृषी क्षेत्रासमोरील असलेल्या अडचणींचे अध्ययन करणे.

४) सदयस्थितीतील आव्हाने व उपाय सुचविणे.

* गृहीतके (Hypothesis)

१) जागतिकीकरणामुळे भारतासारख्या विकासनशिल देशाच्या कृषी व ग्रामीण विकासावर काही प्रमाणात नकारात्मक परिणाम झाला आहे.

Copyright©authors


Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

२) जागतिकीकरणामुळे बेरोजगार व रोजगारामध्ये असुरक्षितता तसेच बाजारपेठमध्ये विकसीत आणि बलाढय देशाचे वर्चस्व असते .

३) जागतिकीकरणामुळे ग्रामिण भागावर सामाजिक , आर्थिक व सांस्कृतीक परिणाम घडत आला .

* संशोधन पध्दती (Research Methodology):

प्रस्तुत संशोधन हे जागतिकीकरण आणि त्याचा कृषी व ग्रामीण भागातील जीवनमानावर पडलेला प्रभाव यासंदर्भातील माहीता प्रस्तुत करीत आहे . सदर माहीती संपादित करतांना संशोधनाच्या विविध पध्दतींचा अवलंब करण्यात आलेला आहे . प्रस्तृत माहीती संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे .

* कृषी व ग्रामीण विकासावरील परिनाम :

विकसनशील देशाचा जेव्हा विकास होऊ लागतो तेव्हा तेथील राष्ट्रीय उत्पन्न निर्यात उत्पन्न आदी घटकामधील् शेतीचा वाटा कमी- कमी होत जातो. अशी वस्तुस्थिती असली तरी देखील भारतासारख्या शेतीप्रधान देशात शेतीचे महत्व कमी होत नाही, कारण भारतातील बहुसंख्य लोकांच्या जीवनमानाचा व ग्रामीण अर्थ व्यवस्थेचा आधार शेती हाच आहे. शेतीप्रधान ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरण यांचा जवळचा संबंध आहे . बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विकसनशील देशात विशेषतः ग्रामीण भागात १९७० ला हरितक्रांतीच्या नावाखाली प्रवेश केला. खते, बीयाणे पिकसंरक्षणाचे उपाय यासारख्या बाबीना 'ॲग्रो बिझनेस' असे गोंडस नाव देऊन बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेत बस्ताण बसविले, परिणामी खते. बीयाणे, पिकसरक्षणाचे उपाय, किटकनाशके याबाबत स्वावलंबी असलेला शेतकरी या कंपन्यांचा अधिन झाला. शेतीवरील खर्च वाढत गेला पण पिकांच्या उत्पादकतेत अपेक्षीत वाढ झालेली दिसून आलेली नाही. जागतिकीकरणामुळे कृषी व ग्रामीण विकासावर प्रत्यक्ष होत असलेले गंभीर परिणाम पुढील प्रमाणे आहेत .

१) जागतिकीकरणाच्या पहील्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे उपलब्ध शेतजमीनि पर्यायी उपयोगाकडे वळविण्यात आल्या . सन २००५ मध्ये भारतीय संसदेने विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) कायदा पास केला. जागतिकीकरणाच्या काळात सेझ, करारशेती, निगम शेती अशा विविध रूपांनी बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशिल देशांच्या ग्रामीण भागात स्वार्थासाठी प्रवेश करीत आहेत . पुर्वी आपल्यासाठी शेती ही काळी आई होती आज तीला विकून व्यापारी

Copyright©authors



Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

फायदयाचे व झटपट श्रीमंत होण्याचे साधन म्हणून वापरले जाऊ लागले. उदया मात्र ती मोठया कपन्यासाठी शोषण करण्याचे साधन झालेले असेल हे नुकसान दिर्घ काळापर्यंत भरुन निघणारे नसेल . यातून नववसाहतवाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

२) जागतिकीकरणामुळे विकसनशील देशाचा वेगाने विकास होईल असे वाटत होते परंतु तसे झालेले दिसून येत नाही. मर्यादित अर्थाने केवळ शहरी भागांचा विकास झाल्याचे दिसून येते. उच्चशिक्षीत मध्यम वर्गाला आकर्षक पॅकेजचा रोजगार मिळून त्यांचे राहणीमान उंचावले, परंतु बहुसंख्य अशा सामान्य वर्गाला जागतिकीकरणाचा किती लाभ झाला हा खरा प्रश्न आहे. प्रत्यक्षात सन २००० मध्ये अनुसूचीत जातीचे ३६% लोक तर अनुसूचीत जमातीचे ४४% लोक दारिद्रय रेषेखाली होते. मागासवर्षीय लोकांना विस्तापित होत असलेल्या आदिवासींना जागतिकीकरणामुळे कोणत्याही प्रकारचा फायदा झाला नाही.

३) जागतिकीकरणामुळे आयात निर्यात निबंध अतिशय शिथील झाले असून त्याचा फारसा विकसनशील देशातील शेतमाल निर्यातीला होईल असे म्हटले जाते . प्रत्यक्षात मात्र जागतिक व्यापाराचे सर्व सुत्र विकसीत देशाचे वर्चस्व असलेल्या जागतिक व्यापार संघटनेच्या हातात एकवटलेली आहेत. जागतिक व्यापार संघटनेने अनुदानाबाबत जे नियम केले आहेत ते प्रत्यक्षात विकसीत देशच डावलत आहेत व स्वतःच्या देशाचा फायदा करत आहेत. अमेरीकेने म्हटले होते की, जागतिक व्यापार संघटनेच्या कराराचे काहीही झाले तरी चालेल पण आमच्या शेतीची अनुदाने कमी केली जाणार नाही. म्हणजेच विकसीत देशातील शेतकऱ्यांना अनुदानाचा भक्कम पाठिंबा असल्याने ते शेतमालाच्या निर्यातीत उभे राहतात आणि भारतासारखे विकसनशील देश मागे पडतात. अर्थातच जागतिकीकरणामुळे शेतमालाच्या निर्यातीच्या संधी वाढल्या आहेत हे म्हणणे प्रत्यक्षात पारस्थितीशी जुळणारे नाही. असेच म्हणावे लागेल.

४) जागतिकीकरणामुळे बौद्धिक संपदा अधिकार कंपन्यांच्या हातात जाऊन त्यांना शोषणाचा नविन मार्ग उपलब्ध झाला आहे. या कायदयामुळे शेतक-यांच्या बियाणे संकलन करण्याचा व विनिमयाचा हक्क हिरावला गेला आहे. भारताच्या बियाने कायदा-२००४ बाबत डॉ.वंदना शिवा म्हणतात की, बेभरवशाचे आणि पुननिर्मिती शक्य नसलेले बियाणे पुरवून खाजगी कंपन्यांनी भारतीय शेतकऱ्याला पराबलंबीत्व, कर्जबाजारीपणा व दुर्दैवाने शेवटी आत्महत्या या अवस्थेला आणून ठेवले आहे.

Copyright©authors



Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

५) जागतिकीकरणामुळे उत्पादन, उद्योग या क्षेत्राबरोबरच शिक्षण क्षेत्रातसुध्दा स्पर्धा निर्माण झाली आहे. नविन निर्माण झालेल्या व्यावसायीक शाळा, महाविदयालये, अभ्यासक्रम व भाषाशिक्षण इत्यादी भरमसाठ शुल्क असलेल्या महागडया शिक्षणसंस्था निर्माण झाल्या. अशा या जीवघेण्या स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता नसतांना सुध्दा ग्रामीण भागातील नागरिक प्रयत्न करीत आहेत व पर्यायाने ते बळी पडत आहेत. एका बाजुला गावातील जिल्हा परिषद शाळा ओस पडत आहेत तर गावातील नागरिकांनी आपल्या मुलांना शहरातील खाजगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षणासाठी पाठविण्याची चढाओढ चालवली आहे. ग्रामीन विदयार्थ्यांचा शिक्षणाचा पाया तेवढा पक्का नसल्यामुळे एवढा खर्च करून देखील त्यांना स्पर्धेत टिकणे कठीण आहे. भविष्यात हया विदयार्थ्यांची अवस्था ना इकडचा ना तिकडचा अशी निर्माण होईल. अर्थात काही प्रमाणात झालेली आहे .

६) जागतिकीकरणाच्या काळात दारिद्रय वाढीची शक्यता अधिक बळावलेली दिसून येते . कारण जागतिकीकरण म्हणजे विकसनशील देशाचा वेगाने विकास ही बाब फक्त शहरी आणि महानगरीय भागांनाच लागु होते. पण बहुसंख्य ग्रामीण भागातील सामान्य जनतेला जागतिकीकरणाने काय दिले हा खरा प्रश्न निर्माण होतो. भारतात १९८३ ते १९९३ या दशकात दारिद्रय रेषेचे प्रमाण ३६% वरुन २६% पर्यंत खाली आले. तर सन २००० साली अनुसूचीत जाती ३६% तर अनुसूचीत जमातीतील ४४% लोक दारिद्रयरेषेखालो होते. यावरुन ग्रामीण भागातील या अ.जा. आणि अ.ज.या गटातील लोकांचा कोणता फायदा झाला हा खरा प्रश्न आहे. वरील परिणामाव्यतिरिक्त जागतिकीकरणामुळे विकसीत राष्ट्रातील चंगळवाद संस्कृतीचे भारतात आगमण, चैनिच्या वस्तुंच्या मागणीतील वाढ, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आगमनामुळे देशी कुटीर उद्योगाचे वाटोळे, बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून ग्रामीण समाजाची पिळवणुक इ. घातक परिणाम झालेले दिसून येतात.

* आर्थिक सुधारणा काळातीलभारतीय कृषी क्षेत्राची स्थिती :

१९९१ नंतरच्या कालावधीपासून भारताने आर्थिक सुधारणांचा स्विकार केला आणि भारतीय अर्थव्यवस्था जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत आकर्षीत झाली. व त्या धतीवर आपल्या अर्थव्यवस्थेत बदल करण्यास सुरुवात केली. उदा.१९९६-९७ मध्ये ४८८, १९९७-९८ मध्ये ३८१, १९९८-९९ मध्ये ८९४ याप्रमाणे १७६३ वरतुच्या आयातीवरील निबंध उठवून सदर वस्तुंची आयात खुली करण्यात आलो. तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपले भांडवल गुंतविण्यास मुक्त प्रवेश देण्यात आला.

Copyright©authors

Drishtikon
(UGC Care Journal)
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

भारतीय कृषी क्षेत्र संकटात आले. अमेरिकेतील कारगिल कॉन्टिनेन्टल ग्रेन आणि युरोपातील मोठ्या कंपन्या अशा एकुण पाच कंपन्यांच्या हाती जगातील ८०% धान्यबाजार एकवटलेला आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या करार करुन कंत्राटी शेती करीत आहेत. त्यांच्या स्पर्धेला देशी कंपन्यांना सामोरे जावे लागत आहे . हीच परिस्थिती कृषी क्षेत्रात सुध्दा निर्माण होणार आहे. किंबहुना झालेली आहे. डंकेलं प्रस्तावानुसार भारत सरकारने शेती अनुदानात प्रचंड कपात केली आहे. जपानमध्ये एकुण शेती उत्पादनाच्या ७२.५%, चीन ३४%, अमेरिका २९% तर भारताकडून फक्त ३% अनुदान दिले जाते. वास्तविक भारतीय शेतीला अनुदानाची नितांत गरज आहे. कारण ८०% शेतकरी छोटे व मध्यम स्वरूपाचे आहेत. थोडक्यात जागतिकीकरणाच्या काळात कृषी विकासाच्या दरात वेगाने घट झाल्याचे दिसून येते. हा दर १९९०-९२ मध्ये १.३% झाला. १९९२ ते १९९७ या काळात ४.७% वाढला नंतर मात्र कमी होत जाऊन २००४-०५ मध्ये तो दर १.१% पर्यंत खाली आला. यावरुन जागतिकीकरणानंतर अनधान्य उत्पादनात निश्चित वाढ झाली असली तरी सरासरी अन्नधान्य उत्पादनाचा दर घटत आहे. त्यामुळे अन्नधान्याच्या मागणी-पुरवठ्यात असंतुलन निर्माण होत आहे.

* कृषी क्षेत्रा समोरील आव्हाने :

१) अजुनहीं भारतातील बहुसंख्य लोकाना रोजगारासाठी शेती हाच पर्याय आहे. कृषी क्षेत्रात रोजगाराचे प्रमाण १९९३- ९४ मध्ये ६४.४% होते ते २०११-१२ मध्ये ४८.९% पर्यंत घटले असले तरीही जास्तीत जास्त लोकांना रोजगारासाठी शेतीवरच अवलंबुन रहावे लागते.

२) हवामान बदलामुळे होणाऱ्या नुकसानीला तोंड देण्यासाठी, तसेच सध्याच्या कोविड -१९ (कोरोना) संसर्गाच्या प्रादुर्भावामुळे कृषी क्षेत्रासमोर मोठे आव्हान उभे राहीलेले आहे. या दृष्टीकोनातुन कृषी क्षेत्राच्या पर्यायाने शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी अनेक बाबींचा विचार करावा लागेल. सध्याच्या योजनांमध्ये वाढ व सुधारणा करणे आवश्यक झाले आहे.

३) अर्थसंकल्पातील कृषी क्षेत्रासाठी एकंदर तरतुदी पहाता शेतकऱ्यांचे मुलभुत प्रश्न कायमचे सुटतील असे वाटत नाही, शेतमाल विकुण उत्पादन खर्च भरून निघत नाही. त्यामुळे नापीकी, कर्जबाजारीपणा अशा अनेक कारणांमुळे शेतकरी हतबल होऊ लागला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न पाच वर्षात दुप्पट केले जाईल याचे आश्वासन दिले आहे. परंतु त्यासाठीकोणताही ठोस कृती कार्यक्रम दिलेला नाही.

Copyright©authors

Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

४) भारताला विकासाच्या दृष्टीने व सामाजिक क्षेत्रात बरीच मजल गाठणे आवश्यक आहे. अन्न, वस्त्र, निवारा, उद्योग, शिक्षण, आरोग्य स्थिती. पायाभूत संरचना अशा विविध क्षेत्रात गुंतवणुकीची गरज आहे. सध्या भारतासमोर कोबीड -१९ (कोरोना) विषाणू संसर्गाच्या प्रादुर्भावासोबतच इतर अनेक समस्या आहेत . म्हणून अशा परिस्थितीत विदेशी गुंतवणुक वाढविणे हा एक महत्वाचा मार्ग आहे.

५) संरक्षित उद्योगांनी आधुनिकीकरणाकडे दुर्लक्ष केलेले आहे. गुणवत्ता वाढविण्याबाबत फारसे प्रयत्न नाहीत. आजारी उद्योगांचे प्रमाण सतत वाढत आहे . संरक्षणामुळे उद्योगांना स्पर्धेची भिती वाटते .

* उपाय योजना :

कृषी व ग्रामीण विकासासाठी भारत सरकारने पुढील उपाय योजना करणे आवश्यक आहे.

१) सध्या कोबीड-१९ (कोरोना) संसर्गाच्या प्रादुर्भावाने संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालेले आहे. ते प्रथम पूर्वपदावर कसे येईल यादृष्टीने आहेत त्या उपाययोजना अधिक कठोरपणे राबविण्याची गरज आहे.

२)कृषी आणि ग्रामीण विकासासाठी प्रथम शेतीसाठी सिंचनाच्या सुविधा निर्माण करुन त्याचा केवळ शेती सिंचनासाठी पूर्ण क्षमतेने उपयोग करणे.

३) स्वस्त दरात शेतीसाठी निरंतर आणि अखंडीतपणे विदयुतपुरवठा करणे .

४) कृषी विपणन व्यवस्थेमार्फत कृषी मालाला हमी भावाची शाश्वती पेरणीपूर्वीच शेतकऱ्याला देणे .

५) पर्जन्याचे अनुमान व पिकलागवड याची अचुक माहीती शेतक - यांना देणे त्यासाठी हवामान खात्याचे संशोधन तंत्र विकसीत करणे.

६) शेतीमालाला संरक्षण व अर्थसहाय्य या बाबींकडे लक्ष देणे, वित्तीय संस्थांकडून विहीत मुदतीत शुन्य व्याजदरात कर्जपुरवठा करणे.

७) पारंपरिक पिक लागवडीपेक्षा कृषी क्षेत्रा मध्ये अमेरिकेच्या धरतीवर जी.एम. वाणांचा वापर करणे . त्यामुळे जगाची अन्नसुरक्षा मजबुत होण्यास मदत होईल . उत्पादन खर्च कमी होईल. पर्यायाने शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल.

८) देशात तयार होणाऱ्या शेतमालाचा जागतिक बाजारपेठेतील मागणीनुसार उत्पादनाचा दर्जा वाढवावा. त्यामुळे निर्यातीत वाढ होईल. आयातीवरील अवलंबीत्व कमी होण्यास मदत होईल.

Copyright©authors



Scanned with OKEN Scanner

आवश्यक आहे.


Drishtikon
(UGC Care Journal)

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

९) आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी देशभर कार्बो सेवा निर्माण करण्यात यावी.

* निष्कर्ष (Conclusion) :

१९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा काळात भारताने जागतिक व्यापार संघटनेच्या जाचक अटींचा स्विकार केलेला आहे. त्यामुळे जागतिकीकरणाचे चांगले आणि वाईट असे दोन्ही परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पर्यायाने कृषी आणि ग्रामीण विकासावर झालेले आहेत. तथापी वाईट परिणामापेक्षा चांगले परिणाम जास्त झालेले दिसून येतात. उदा. विदेशी विनिमय बाजारपेठांचा विकास, औद्योगिक विकास, सांस्कृतीक देवान-घेवाण, रोजगाराच्या संधीत वाढ , राहणीमानाच्या पातळीत वाढ इत्यादी . भविष्यकाळात जागतिकीकरणाचे कोणते परिणाम भारताच्या दृष्टीकोणातून फायदयाचे ठरतील हे पाहून भारताने पावले उचलणे आवश्यक आहे. कारण जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरु झाली असून ती थांबविणे आता शक्य नाही. या प्रक्रियेला जशजशी गती प्राप्त होईल तसतशी निरनिराळ्या देशातील वाणिज्य व व्यापारामध्ये जदल वाढ होईल. शहरी विकासाबरोबरच ग्रामीण आणि कृषी विकासात अधिकाधिक वाढ होत जाईल. त्यामुळे भारतीय शेतकऱ्याच्या आत्महत्या बंद होतील, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थितो सुधारेल आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक ताकदीवरच आपली ग्रामीण व कृषीप्रधान अर्थव्यवस्था महासत्ता होईल अशी अपेक्षा व्यक्त करुया.

**संदर्भ सुची :**

१) मिश्न-पुरी-भारतीय अर्थव्यवस्था, मेहता पब्लीशिंग हाऊस-२००७

२) दत्त सुंदरम-भारतीय अर्थव्यवस्था, प्रकाशक एस. चंद्र-पृ.२४६-२५०

३) डॉ.कविमंडन विजय-कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

४) देशपांडे श्रीधर, देशपांडे विनायक-भारतीय अर्थव्यवस्था (संक्रमण आणि विकास), हिमालय पब्लीकेशन, पृ.२७४,२७७

५) पाटील जयंत-जागतिकीकरण व ग्रामीण अर्थव्यवस्था, अर्थसंवाद, एप्रिल-जुन-२००५ , खुड-२८ अंक-१

६) कराडे जगन-जागतिकीकरण, भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लीकेशन, पुणे पृ.३,५

Copyright©authors


Scanned with OKEN Scanner

(23)

EDUINDEX

# PUBLICATION CERTIFICATE

**This publication certificate has been issued to**

प्रा. डॉ. अरुण उखा पाटील

**For publication of research paper titled**

धुळे जिल्हयातील भिल्ल (आदिवासी) समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अर्थशास्त्रीय अध्ययन (कालखंड २०१० ते २०२०) एक दृष्टीक्षेप

**Published in** *Drishtikon with ISSN 0975-119X*

**Vol.** *12* **Issue** *7* **Month** *May* **Year** *2020*

**Impact Factor** *5.60*

**The journal is indexed, peer reviewed and listed in UGC Care.**

SH Sharma

**Editor**

**Note:**This eCertificate is valid with published papers and the paper must be available online at the website under the network of EDUindex. For cross check you can contact at editor@eduindex.org

Scanned with OKEN Scanner

Drishtikon
(UGC Care Journal)
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

# धुळे जिल्हयातील भिल्ल (आदिवासी) समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचे अर्थशास्त्रीय अध्ययन (कालखंड २०१० ते २०२०) एक दृष्टीक्षेप

**श्री. नितीन मांगुलाल महाले**
**संशोधक**
सहाय्यक लेखा अधिकारी
जिल्हा परिषद, धुळे
nitinmahale@yahoo.com

**प्रा. डॉ. अरुण उखा पाटील**
मार्गदर्शक
विद्या विकास मंडळाचे कला व वाणिज्य महाविदयालय
अक्कलकुवा जि. नंदुरबार

**गोषवारा:**

धुळे जिल्हयात भिल्ल जमातीची लोकसंख्या मोठया प्रमाणावर एकवटलेली आढळुन येते. सदर भील आदिवासी हे अतिशय दारिद्रयाच्या अवस्थेत आजही आहेत. त्यांच्यापर्यत शासनाच्या योजना हया मुबलक प्रमाणात पोहोचलेल्या नाहीत. त्यांचा आजही पुरेसा शौजन्य विकास झालेला आढळून येत नाही. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण अतिशय अल्प अशा स्वरुपाचे आहे. त्यांचा उदरनिर्वाह हा निबाडकष्टाची कामे करुन होत असतो. मोलमजुरी तसेच कंत्राटदारांच्या येथे कामे करीत हा समाज आपला उदरनिर्वाह भागवत आहे. या जमातीकडे फारच तोकडया लोकांकडे स्वत:च्या जमिनी राहीलेल्या आहेत. कोरडवाहू जमिनी हया जास्त प्रमाणात आहेत. जेथे काही पिकत नाही अशा जमिनी आहेत. बऱ्याचशा भिल्ल बांधवांनी आपल्याकडील जमिनी हया अतिशय मातीमोल किंमतीने दुसऱ्यास विक्री केलेल्या आहेत.

Copyright©authors

Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

आदिवासी समाजाचे मुख्य उदिदष्ट म्हणजे स्वतःचा आर्थिक व सामाजिक विकास साध्य करणे, आर्थिक विकास जर साध्य करावयाचा असेल तर भिल्ल समाजाने शिक्षीत होणे गरजेचे आहे. दुर दृष्टी ठेऊन व योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. जोपर्यंत शासनाच्या योजना हया आपल्यासाठी आहेत हे कळत नाही. तोपर्यंत सदर योजनांचा लाभ आदिवासीला घेता येणार नाही. आदिवासी विकासाला सामोरे जाण्यासाठी एकच म्हणजे नविन ज्ञान आत्मसात करा. आदिवासी समाज हा भारतातील महत्वपूर्ण जनजातींपैकी एक महत्वाचा घटक आहे. आदिवासींना अनुसूचित जमातीचा दर्जा दिलेला आहे. परंतु आदिवासी भिल्ल समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास झालेला दिसून येत नाही.

**<u>प्रास्ताविक:</u>**

आर्याच्या आगमनापूर्वी या देशात अनेक टोळयांचे अस्तित्व होते. हया टोळयांतील लोकच या देशातील मुळ राहीवाशी होत. यातील काही टोळया आर्यांच्या शरण गेल्यात तर काही स्वाभिमानी टोळया पराभूत झाल्यानंतरही स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी डोंगरदऱ्यांचा आश्रय घेवून आपले जीवन जगू लागलेत हा आधी राहीवास करीत असलेला समूह म्हणजेच आदिवासी होय. आदिवासी हा शब्द या मातीशी इमानसांगलो त्यांना वन्य जाती असेही म्हणतात. प्राचीन काळात भारतात राहत असलेल्या प्रोटोआस्ट्रलाइड, मंगोलाईड व नेग्रीटो या भिन्न मानववंशापासूनच आदिवासींची उत्पती झाली असल्याचे मत आता रुढ झाले आहे. म्हणजेच आदिवासी लोक हे या देशातील आद्य रहिवाशी होत. आर्य येण्यापूर्वी या देशात हिमालयाच्या पायथ्याशी आदिवासी गणांची राज्ये होती मात्र आर्यांच्या कुटील डाव पेचांना बळी पडून त्यांचा पराभव झाल्याने ते इतरत्र स्वसंरक्षणाकरीता स्थलांतरीत झालेत.

महाराष्ट्रातही आदिवासींची छोटी छोटी राज्ये होती काही जमिनदारही होते. ब्रिटीशांनी त्यांचे हक्क काढून घेतल्याने त्यांच्यात असंतोष निर्माण झाला.ज्या देशात ही स्वयंभू व स्वतंत्र भिल्ल राजांना ब्रिटीशांचा हस्तक्षेप सहन झाला नाही त्यातून भिल्लांनी इंग्रजांविरुध्द सशस्त्र उठाव केलेत अशाच स्वतंत्र, स्वाभिमानी जमातीवर लेखन करण्याची प्रेरणा मिळाली.

**<u>संशोधनाची उदिदष्टे:-</u>**

1. भिल्ल समाजाच्या आर्थिक समस्यांचे अध्ययन करणे.
2. धुळे जिल्हयातील भिल्ल समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. धुळे जिल्हयातील भिल्ल समाजाच्या मागासलेपणाची कारणे शोधणे.
4. शासनाकडून राबविल्या जाणाऱ्या योजनांचा अभ्यास करणे.



Scanned with OKEN Scanner

Drishtikon
(UGC Care Journal)
ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

5. धुळे जिल्ह्यातील भिल्ल समाजासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अडचणींचा शोध घेणे व त्यावर उपयोजनांची शिफारस करणे.
6. धुळे जिल्ह्यातील भिल्ल समाजाच्या आदिवासी समाज व्यवस्थेचा अभ्यास करणे.
7. धुळे जिल्ह्यातील भिल्ल विकास आराखडा तयार करुन शिफारस करणे.

**संशोधनाचीगृहीतके:-**

1) आदिवासी उपक्षेत्राबाहेरील भिल्ल जमातीचा आर्थिक विकास झालेला नाही.

2) आदिवासी उपक्षेत्राबाहेरील भिल्ल जमातीचा सामाजिक विकास झालेला नाही.

**संशोधन पध्दती:-**

नियोजीत संशोधनासाठी संशोधक प्राथमिक आणि दुय्यम स्वरुपाची माहिती आणि आकडेवारी गोळा करुन संकल्पनेत प्राथमिक आकडेवारी गोळा करण्यासाठी संशोधक प्रश्नावली आणि मुलाखत तंत्राचा अवलंब करणार आहे. तर दुय्यम स्वरुपाच्या माहीती आणि आकडेवारी साठी वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भ पुस्तके, महसूल कार्यालयीन दस्तऐवज इ. चा वापर करणार आहे.

**प्राथमिक साधने:-**

शासकीय आकडेवारी सर्वेक्षण, सहकार अहवाल, महाराष्ट्र शासन अहवाल आदिवासी विकास मंत्रालय.

**दुय्यम साधने :**

पुस्तके, मासिके, संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे इ.

**संशोधनाची मर्यादा :**

सदरचा विषय हा धुळे जिल्ह्यातील आदिवासी उपक्षेत्राबाहेरील भिल्ल आदिवास्यानंवर केंद्रीत करण्यात आला आहे. म्हणजेच धुळे जिल्ह्यातील शिरपूर व साक्री तालुका वगळता उर्वरित धुळे व शिंदखेडा तालुक्याचा समावेश बिगर आदिवासी उपक्षेत्रात (Other Trible Sub Plan) येतो. भिल्ल हा आदिवासी समाज शहरालगत राहत असून त्यांचा आर्थिक व सामाजिक मागासलेले जीवन ते आजही जगत आहे.

आजच्या परिस्थितीत धुळे जिल्ह्यातील भिल्ल समाज हा जरी शहरालगत राहत असला तरी त्यास आजच्या भाषेत आदीवासी उपक्षेत्राबाहेरील आदीवासी (Other Trible Sub Plan) म्हणतात. त्यास आवश्यक असणाऱ्या मुलभुत गरजांपासून तो आजही वंचीत आहे. त्यात शिक्षण,

Copyright©authors

Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

आर्थिक विकास, सामाजिक विकास व आरोग्य हे अतिशय महत्वाचे घटक आहे. हा समाज व्यसनाधिनतेकडे अधिक वळलेलाआहे, त्यामुळे या समाजाचे सरासरी जीवनमान हे कमी झालेले आहे.

भिल्ल समाजाची अविकासाची अनेक कारणे आहेत त्या कारणांचा ऊहापोह निष्कर्ष व शिफारसी या प्रकरणात करण्यात आलेला आहे. सदर सुचना या भिल्ल समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, तसेच आरोग्यविषयक उन्नती साध्य करण्यासाठी परिणामकारक सिध्द होऊशकतात असे अभ्यासकाचे मत आहे.

**भिल्लांचे आर्थिक जीवन:-**

सामाजिक दर्जा ठरविण्यामागे व्यक्तीची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व राजकीय प्रगती किती आहे ही बाब जशी समाजात महत्वाची मानली जाते तसेच व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा ही मानवी जीवनाचा अंग ठरतो.

स्थानिक बाजारपेठेत दुकानदार, व्यापारी, दलाल आदिवासींची मोठया प्रमाणावर लुट करतात. भुमिहीन शेतमजुर यांची स्थिती तर अजुनही दयनीय आहे. भूमीहीनांचे जीवन अस्थिर आहे. भुमिहीन हे रोजगाराच्या निमित्ताने गुजरात, कर्नाटक राज्यात ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. त्यांच्या मुला-बाळांचे शिक्षण राहून जाते त्यामुळे शिक्षणाअभावी भिल्लांची आर्थिक व शैक्षणिक स्थिती आणखीनच बिकट बनत चालली आहे.

**भिल्लांचे सामाजिक जीवन:-**

1) प्रगत समाजातील अनेक अनिष्ट प्रथांचा शिरकाव आदिवासींच्या जीवनात झाला आहे. बालविवाह, हुंडापध्दती, स्यियांविषयीचाअनुदार दृष्टीकोण यांसारख्या काही प्रथांचा या संदर्भात आपणास उल्लेख करता येईल.

2) परिवर्तनाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजातील अनेक चांगल्या सामाजिक प्रथांचा ऱ्हास झाला.

3) प्रगत समाजातील जमीनदार, सावकार, व्यापारी, ठेकेदार, सरकारी अधिकारी अशा अनेक घटकांनी आदिवासी स्त्रियांचे लैंगिक शोषण केले, त्यांच्या दृष्टीने आदिवासी स्त्रीया उपभोगाच्या वस्तू ठरल्या.

4) विविध धर्मप्रसारकांनी आदिवासींविषयी सहानुभुतीपूर्ण दृष्टीकोण ठेवला होता. परंतु त्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्यामुळे आदिवासीआपल्या मुळ संस्कृतीपासून दुरावला गेला व तो विविध धर्माच्या नावाखाली स्वतःला हरवून बसला व तो विविध धर्मात विखुरला जेलेला

Copyright©authors


Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

आहे. यात धर्मप्रसारकांनी आदिवासींचा फार मोठया प्रमाणात भोळेपणाचा फायदा उचलला आहे.

5) भिल्लांची पारंपारिक पध्दती तसेच रुढी हया लोप पावत चालल्या आहेत. पुर्वी भिलाटीमध्ये ढोल व पावरीच्या नादात लग्ने लावलीजात असत. गावदिवाळी व होळी ही सणे मोठया उत्साहाने साजरी केली जात असत. तसेच आदिवासी परंपरेनुसार लग्ने लावली जात असत. तसेच सण साजरी केली जात असत. परंतु सुवर्ण समाजाने त्याच्यावरही घाला घातला आहे. पारंपारीक ढोलाच्या जागी ताशा वबॅन्ड व डिजे पोहोचले आहेत. त्यामुळे बरडा भिलांची युवा पिढी त्यांची वंशपरापरगत साधने तसेच संस्कृती विसरत चालला आहे.

**आदिवासी विकास:-**

एकवीसाव्या शतकात भारत देश तांत्रिकदृष्टया प्रगतीकडे वाटचाल करीत आहे .परंतु, सामाजिक दृष्टया भारतातील आदिवासी जमाती आजही त्यांच्या मुलभूत हक्कांसाठी झगडत आहे. आजही आदिवासी भिल्ल समाज मोठया प्रमाणात मागासलेला आहे. भारताच्या राज्यघटनेत देशातील सर्व स्तरावरच्या नागरिकांसाठी सर्व समाविष्ट व्यापक अशा तरतुदी केलेल्या आहेत. शिवाय वेळोवेळी आदिवासींच्या विकासाच्या दृष्टीने अनेक कायद्याच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी सरकार मार्फत विविध शासकीय योजना सुरु करण्यात आल्या आहेत. परंतु या योजना राबवितांना सर्वच योजना आदिवासी समाजापर्यंत पोहचत नाही, या दृष्टीने पुढील उद्दिष्ट्ये लक्षात घेवून मी या विषयाची निवड केली आहे.

महाराष्ट्र शासनाने इ.स.१९९८ मध्ये धुळे जिल्हयाचे विभाजन करुन नंदुरबार जिल्हयाची निर्मिती केली. त्यामुळे धुळे व नंदुरबार जिल्हयात भिल्ल समाजाची लोकसंख्येचे दोन भाग पडले. त्यात नंदुरबार जिल्हा हा १००% आदिवासी जिल्हा म्हणून नावारुपाला आला व धुळे जिल्हयात काही अंशी आदिवासी समाज राहीला.

त्यानंतर सरकारने आदिवासींच्या विकास करण्यासाठी टीएसपी (TSP) विभाग व ओटीएसपी (OTSP) विभाग अशा प्रकारे दोन विभाग करण्यात आले, टीएसपी विभागातील योजना व ओटीएसपी विभागातील योजना यांत फरक करण्यात आला. आजच्या परिस्थितीत धुळे जिल्हयातील भिल्ल समाज हा जरी शहरालगत राहत असला. त्यास आजच्या भाषेत आदिवासी उपक्षेत्राबाहेरील आदिवासी म्हणतात. त्यास आवश्यक असणाऱ्या मुलभुत गरजांपासून तो आजही

Copyright©authors

Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

वंचीत आहे. त्यात शिक्षण,आर्थिक विकास, सामाजिक विकास, व आरोग्य हे अतिशय महत्त्वाचे घटक आहेत.

आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी विकास विभाग व शबरी आदिवासी विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. सदरविभागामार्फत अनेक योजना राबविण्यात येतात त्या योजनांचा लाभ खरोखरच ओटीएसपी क्षेत्रातील आदिवासींना होतो की नाही याचे अध्ययन जरण्याचा हेतुने सदर विषय निवड केला.

**निष्कर्ष :-**

आदिवासी समाजाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे स्वत:चा आर्थिक व सामाजिक विकास साध्य करणे. आर्थिक विकास जर साध्य करावयाचा असेल तर भिल्ल समाजाने शिक्षीत होणे गरजेचे आहे. दुरदृष्टी ठेऊन व योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. जोपर्यंत शासनाच्या योजना ह्या आपल्यासाठी आहेत हे कळत नाही तोपर्यंत सदर योजनांचा लाभ आदिवासीला घेता येणार नाही. आदिवासी विकासाला सामोरे जाण्यासाठी एकच म्हणजे नविन ज्ञान आत्मसात करा. आदिवासी समाज हा भारतातील महत्वपूर्ण जनजातींपैकी एक महत्वाचा घटक आहे. आदिवासींना अनुसूचित जमातीचा दर्जा दिलेला आहे. परंतु आदिवासी भिल्ल समाजाचा आर्थिक व सामाजिक विकास झालेला दिसून येत नाही.

1) आदिवासी उपक्षेत्राबाहेरील भिल्ल जमातीसाठी विशेष विकास निधी मंजुर करुन त्यांच्या विकासासाठी विशेष प्रयत्न होणे गरजेचे आहे.

2) भिल्ल जमातीला रोजगाराच्या संधी तसेच शैक्षणीक संधी मिळाल्यास त्यांना प्रजाती साध्य करता येऊ शकेल तसेच त्याचे शिक्षण अर्धवटराहणार नाही याचीही काळजी घेतली गेली पाहीजे.

3) पेसा कायदयाचा निकष आहे की ज्या गावात/पाडा आदिवासींची ५० टक्के वस्ती असेल त्याचा समावेश पेसा गावात करण्यात यावा. ही अट शिथील करण्यात येऊन. ज्या गावात आदिवासींची ३० टक्के लोकसंख्या असेल त्या गावास पेसा क्षेत्रातील गाव घोषीत करण्यातयावे. तसेच धुळे जिल्हातील गावांचा नव्याने सर्वे करण्यात येऊन बरडा भिल्लांच्या लोकसंख्येनुसार पेसा क्षेत्र घोषीत करण्यात यावे.

4) आदिवासींच्या विकास कार्यासाठी किती पैसे खर्च झाले यावरुन प्रगतीचा निष्कर्ष न काढता, त्यांच्या आर्थिक व सामाजिक व स्वभावजभूज विशेषांच्या विकासाच्या आधारे तो ठरवला गेला पाहीजे, या सुत्रानुसार आदिवासींच्या जीवनात जास्त हस्तक्षेप न करता त्यांनी चांगलेजीवन जगण्यासाठी सामूहीक प्रयत्न झाले पाहिजेत.

Copyright©authors


Scanned with OKEN Scanner

ISSN 0975-119X
Vol-12-Issue-7, May-2020

5) आदिवासींच्या आर्थिक उन्नतीशिवाय त्यांना त्यांच्या मुलभूत गरजा प्राप्त करुन घेता येणे शक्य नाही आर्थीक परिस्थिती व आरोग्य ह्या परस्परपुरक गोष्टी आहेत वैयक्तीक लाभाच्या योजना मोठया प्रमाणात वाढविणे गरजेचे आहे आर्थिक उन्नतीमुळे स्थानिक पातळीवर उपलब्ध असणारे फळ, भाज्या,दुध त्यांना विकण्याची गरज पडणार नाही. त्यांच्या वापरातून त्यांना योग्य प्रकारचा आहार मिळू शकेल.

**संदर्भ साधने:**

1. Dr.Majumdar D.N. and Dr. Madan T.N.- An Introduction to Social Authropology Asia PublishingHouse, p.२२१
2. Dr.Majumdar D.N.-Races and Culture of India, p.३५५
3. इन्थ्रोवेन आर.ई. दि ट्राईब अॅण्ड कास्टस ऑफ बॉम्बे, तीन खंड१९२२, पुनर्मुद्रण-१९९४
4. भारतीय संविधान ज्लम ३४२(१)
5. महाराष्ट्र शासन नागरिकांची सनद आदिवासी विकास मंत्रालय मुंबई.
6. श्री जोसावी जो.रा. - आदिवासींच्या कल्याणकारी योजना (आदिवासी संशोधन पत्रिका मार्च १९९९)
7. डॉ.गोविंद गारे - महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृतीच्या समस्या व विकास
8. डॉ. गारे जोविंद - सातपुडयातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा
9. उपाध्याय विजय आणि शर्मा विजय- भारत की जनजातीय संस्कृती, मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी, भोपाळ,१९८९
10. उप्रेती हरिचंद्र- भारतीय जनजातीयाँ,मध्यप्रदेश हिंदी ग्रंथ अकादमी.

**मासिके :-**

1. महाराष्ट्र शासन धुळे जिल्हा गॅझेटियर
2. संशोधन पत्रिका आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र
3. आदिवासी संदर्भ पुस्तिका- आवृत्ती १ ली

Copyright©authors



Scanned with OKEN Scanner

Vol [illegible] (Special Issue 4)
Jan[illegible]ry 2020

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR
4.270




२६ जानेवारी २०२०

भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त...

# संशोधन पद्धती

# Research Methodology

**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com Visit - www.jrdrvb.com

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 62 | इंद्रायणी ज्ञानेश्वर सेंदाणे | संशोधन पद्धती : स्वरूप, व्याप्ती व टप्पे | 210-211 |
| 63 | प्रा.डॉ. अनिल विठ्ठल बाविस्कर | "तथ्य संकलनाची तंत्रे" | 212-215 |
| 64 | प्रा.डॉ. सुधाकर नारायण भालेराव | सामाजिक शास्त्रे, साहित्य संशोधन : तुलनात्मक पध्दती | 216-218 |
| 65 | प्रा.डॉ. मधुकर आ. देसले | "सामाजिक संशोधनातील मुलाखत तंत्राचे फायदे-तोटे एक समाजशास्त्रीय अभ्यास" | 219-221 |
| 66 | प्रा. डॉ. शकुंतला एम. भारंबे | मराठी वाङमयातील संशोधन क्षेत्र | 222-224 |
| 67 | प्रा.डॉ. भामरे नानाजी दगा | इतिहासातील संशोधनाच्या पायऱ्या | 225-229 |
| 68 | प्रा.डॉ. सौ. सुषमा प्रमोद पाटील | "भारतात सामाजिक संशोधनाची आवश्यकता व उपयुक्तता" | 230-232 |
| 69 | प्रा.डॉ. रविंद्र दगडू वाघ<br>प्रकाश एकनाथ वाघ | सामाजिक संशोधनात अहवाल लेखनाचे महत्व | 233-235 |
| 70 | प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | "संशोधन कार्यात संशोधन आराखड्याची आवश्यकता" | 236-238 |
| 71 | श्रीमती सुलक्षणा किसनराव भरगंडे | संशोधन अहवाल लेखन पध्दती : एक अभ्यास | 239-241 |
| 72 | Mr. Bitu Shivaji Molane<br>Dr. Wangujare S. A. | सोलापूर विद्यापीठातील ॲथलेटिक्स खेळाडूंच्या शारीरिक क्षमतांचा चिकित्सक अभ्यास | 242-244 |
| 73 | प्रा.डॉ. डी.डी. राठोड | "संशोधनाची रूपरेषा आणि गृहितके" | 245-246 |
| 74 | प्रा.डॉ. राजधर चैत्राम बेडसे | संशोधनातील प्रश्नावलीचे फायदे व तोटे | 247-249 |
| 75 | Dr. Jagdish J. Patil | How To Write Research Report ? | 250-251 |
| 76 | Dr. Pramod Bhumbe | Research Methodology in Social Work | 252-253 |
| 77 | Vijay Bajirao Jadhav,<br>Dr. Anil M. Chaudhari | Research Methods in context of LIS | 254-256 |
| 78 | Jadhav S.L. | Writing the Research Report | 257-259 |
| 79 | प्रा. एम.जी. वसावे | अनुसन्धान में निदर्शन पद्धति के गुण एवं दोष | 260-262 |
| 80 | प्रफुल ईश्वरराव ढोके | नमुना निवडीचे तंत्र व प्रकार | 263-268 |
| 81 | प्रा. राधेश्याम शं. ठाकरे | संशोधनाची उद्दिष्टे व महत्त्व | 269-270 |
| 82 | श्री.सुनिल छोटू पवार<br>प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील | पश्चिम खान्देशातील संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आचार्य प्र.के.अत्रे यांचे प्रबोधन | 271-274 |

Journal of Research & Development Vol. 10 (Special Issue 4) January 2020, (ISSN-2230-9578)
COSMOS IMPACT FACTOR - 4.270

# "संशोधन कार्यात संशोधन आराखड्याची आवश्यकता"

प्रा.डॉ. अरुण उखा पाटील (अर्थशास्त्र)
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि.नंदुरबार

**• प्रस्तावना :-**

समाजशास्त्रीय संशोधन आणि अर्थशास्त्रीय संशोधन कार्यात संशोधन आराखड्यास विशेष महत्व आहे. कारण त्याआधारे प्रस्तुत प्रकरणाचा विषय, विषयाची व्याप्ती, विम्याच्या माहिती संकलनाबाबत अधिक तपशिल मिळतो.

सामाजिक संशोधनातील आणि विशेषत: अर्थशास्त्रीय संशोधनातील संशोधन आराखडा ही प्रमुख पायरी समजली जाते. संशोधकाला आपल्या संशोधनात पद्धतशीरपणे नियोजन करावे लागते. त्याची रूपरेखा ठरवावी लागते. संशोधनाची मांडणी निश्चित करून त्याचे स्वरूप स्पष्ट करावे लागते. त्यालाच संशोधनाचा आराखडा म्हणतात. ज्याप्रमाणे एखादे धरण बांधतांना किंवा इमारत उभी करतांना बांधकामाचा जसा आराखडा तयार केला जातो त्याच पद्धतीने संशोधन कार्याचा आराखडा तयार केला जातो. हा संशोधन आराखडा तयार करतांना संशोधकास संशोधनाचा विषय, उद्देश, अध्ययन, क्षेत्र कालावधी, नमुना निवड पद्धती ठरविणे, तथ्य संकलनाची साधने ठरविणे, संशोधनकर्त्याचा तपशील ठरविणे या स… प्रक्रियेस संशोधनाचा आराखडा म्हणता येईल.

**संशोधन आराखड्याचा अर्थ :-** संशोधन आराखडा म्हणजे सामाजिक संशोधन तंत्राचा एक प्रकार असून सामाजिक समस्येची पूर्तता करण्याचे ते साधन आहे. त्यासाठी योग्य त्या माहितीची निवड करणे आणि संकलन करणे महत्वाचे असते. त्यासाठी योग्य व्यक्ती, पद्धती, प्रकार, तंत्र आणि संशोधक यांची आवश्यकता असते. संशोधन आराखड्याबाबत विविध संशोधकांनी केलेल्या व्याख्यांवरून संशोधन आराखड्याचा अर्थ स्पष्ट होतो.

रसेल अकॉफ :- "आराखडा ही एक निर्णय प्रक्रिया आहे. त्यात विशिष्ट घटना गृहीत धरून त्या दिशेने नियंत्रणाखाली नसलेल्या घटनांबाबत भाकीत करण्यासाठी वापरण्यात येणारी पद्धती म्हणजे संशोधन आराखडा होय." सदर व्याख्या प्र… रसेल यांनी डिसाईन ऑफ सोशल रिसर्च या पुस्तकात दिली आहे.

संशोधन आराखड्याच्या वरील व्याख्यांवरून संशोधन आराखड्यात पुढील प्रश्नांचा समावेश होतो :-

१) अभ्यासविषय कोणता आहे? २) संशोधन का केले जाते.? ३) संशोधन कोठे केले जाते? ४) माहितीचे संकलन करण्यासाठी कोणता प्रकार वापरला जातो? ५) त्यासाठी किती कालावधी लागेल ? ६) नमुना निवडीचा आराखडा कसा असेल? ७) माहिती संकलन तंत्र कोणते असेल? ८) माहितीचे विश्लेषण कसे असेल? ९) संशोधन अहवाल कोणत्या प्रकारे तयार केला जाईल?

थोडक्यात संशोधन आराखड्यात पुढील बाबी महत्वपूर्ण आहेत:

i. संशोधन समस्या विधान स्पष्ट शब्दात असावे.
ii. संशोधन कार्यासाठी निवड केलेल्या विशिष्ट गटांची संख्या अभ्यासावी.
iii. त्यातून योग्य त्या प्रातिनिधीक स्वरूपाच्या संख्येची निवड करावी.
iv. तंत्र आणि प्रक्रिया यांचा माहिती संकलनासाठी वापर करावा.
v. संकलीत माहितीचे विश्लेषण आणि त्यावरील प्रक्रिया संशोधनात्मक पद्धतीचा वापर करून केलेली अस… पाहिजे.

**संशोधन आराखड्याची आवश्यकता :-** समाजशास्त्रीय आणि विशेषत: अर्थशास्त्रीय संशोधन आराखड्या… आवश्यकता पुढील मुद्यांच्या सहाय्याने स्पष्ट करता येईल.

**१) अचूक निष्कर्षाची कल्पना :-** संशोधनाचा आराखडा हा संशोधन विषयाला एक निश्चित दिशा प्राप्त क… देण्यासाठी उपयुक्त असतो. सुरूवातीपासून ते शेवटपर्यंत आराखड्यात संशोधनाविषयीची माहिती असते. आराखड्या… संशोधकाला आपले निष्कर्ष किती बिनचूक काढता येतील याचा अंदाज करता येतो. आराखडा नसेल तर संशोधकाला … अभ्यास पद्धतीचा उपयोग करून घ्यावयाचा असतो त्याच्या मदतीने उपलब्ध होणारी तथ्ये व त्या तथ्यांचा आधार घे… काढलेले निष्कर्ष अचूक निघण्याची शक्यता नसते व संशोधक सुद्धा या बाबतीत साशंक असतो.



Scanned with OKEN Scanner

२) तंत्र व साधन :- संशोधन विषय निश्चित झाल्यानंतर त्यासंबंधीची माहिती मिळविणे ही मुख्य बाब आहे. ही माहिती जितकी अचूक व वस्तुनिष्ठ असेल, तितके त्या आधारे काढलेले निष्कर्ष अचूक व वस्तुनिष्ठ असतात. त्यासाठी माहिती मिळविण्यासाठी कोणती तंत्रे व साधने वापरावयाची हा विचार मुलगामी असतो. तेव्हा तंत्र साधनसंबंधीचा पूर्व विचार करणे हे आवश्यक असते.

३) श्रम, शक्ती व पैसा यांचा पर्याप्त वापर :- संशोधन आराखडा जाणीवपूर्वक तयार केल्याने त्याला पूर्वनियोजित स्वरूप प्राप्त झालेले असते. आराखड्याचा अभ्यासविषय, अभ्यासाचा हेतू, वेळ, पैसा नि श्रमाबरोबर तंत्रे व साधनांचा सुद्धा विचार केलेला असतो. हे सर्व परिपूर्ण असल्यामुळे संशोधकाला भेडसावणारी अडचण तीव्र स्वरूपाची वाटत नसते.

४) तथ्य विश्लेषण :- संशोधनकर्ता संबंधित विषयाची माहिती संकलित केल्यानंतर तथ्यांचा शोध घेत असतो. शोधलेल्या तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण व स्तंभीकरण केल्यानंतर त्याचे विश्लेषण करीत असतो. अर्थात हे तथ्य विश्लेषणाचे कार्य योग्य रितीने करणे जरूरीचे असते. संशोधन आराखडा नसेल तर तथ्यांच्या ढिगाकडे बघून संशोधक गोंधळून जाण्याची शक्यता असते. परंतु आराखडा जर तयार असेल तर गोंधळ होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. म्हणून अत्यंत संयमाने व विचारांती संशोधक तथ्यांचे विश्लेषण करीत असतो.

५) आदर्श रूपरेखा :- समस्या निश्चित केल्यानंतर त्यासंबंधी निष्कर्ष मांडून त्यासंबंधी अधिकाधिक माहिती उपलब्ध करून देणे महत्वाचे असते. तेव्हा त्या समस्यांची गुंतागुंत कशा पद्धतीने सोडविता येईल. या संबंधीचा पूर्व विचार असणे आवश्यक आहे. समस्येच्या सर्व अंगांचा विचार करतांना त्या समस्येसंबंधीचे चित्र डोळ्यासमोर असले पाहिजे. यासाठीच संशोधन आराखडा तयार केला पाहिजे.

• चांगल्या संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये :-

संशोधन कार्यातील चांगल्या संशोधन आराखड्याची वैशिष्ट्ये विचारात घेतांना त्यातील उद्दिष्ट्ये, सत्यता, विश्वसनीयता आणि सामान्यीकरण या बाबींवर भर दिला जातो. सर्वसाधारणपणे आराखड्यात कमीत-कमी प्रमाणात पूर्वग्रह दृष्टीकोन असतो. माहिती संकलन आणि विश्लेषण अधिक विश्वसनीय स्वरूपाचे असते. संशोधन आराखड्यामध्ये किमान अनुभवजन्य चूक राहते असा आराखडा सर्वोत्तम आराखडा ठरतो. त्याचप्रमाणे या आराखड्यामुळे अधिकाधिक प्रमाणात माहिती मिळते व समस्येचे निराकण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध बाजूंचा अभ्यास करण्याची संधी मिळते. संशोधन आराखड्यात विशिष्ट सामाजिक किंवा आर्थिक समस्येचा विचार केला जातो. अशा वेळेला पुढील बाबींचा विचार होतो.

i. माहिती संकलन करण्यासाठी वापरली जाणारी साधने.
ii. संशोधक आणि संशोधकाचे सहकारी यांची उपलब्धता.
iii. त्याचे कौशल्य अभ्यासावयाच्या समस्येची उद्दिष्ट्ये.
iv. अभ्यासल्या जाणाऱ्या समस्येचे स्वरूप.
v. संशोधकाकडे उपलब्ध असलेला वेळ आणि पैसा.

प्रत्येक आराखड्यामध्ये बलस्थाने आणि कमकुवत स्थान असते. चांगल्या प्रकारचा संशोधन आराखडा हा उद्दिष्ट्ये, विश्वसनीयता, सत्यता, सामान्यीकरण इ. प्रमुख घटकांवर आधारित असतो.

१) उद्दिष्टता :- अर्थशास्त्रीय व समाजशास्त्रीय संशोधनात विशेषत: अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि समाजशास्त्र यांच्यात उद्दिष्टांना अधिक महत्व आहे. प्रत्येक संशोधन हे विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून केलेले असणे यालाच उद्दिष्टता म्हणतात. संशोधन कार्यात संशोधक कित्येक वेळेला साचेबंद प्रश्नावलीचा वापर करतो. त्यात बहुविध उत्तरे असणारा प्रश्न असतो आणि प्रतिक्रिया देणाऱ्या व्यक्तीला त्या उत्तरामधील एक उत्तर निवडावे लागते तसेच खुल्या प्रश्नावलीत विशिष्ट प्रश्नांबाबत उत्तर देणाऱ्यास अधिक विचार करण्याची संधी मिळते आणि त्यांच्या इच्छेप्रमाणे उत्तर देता येते. या दोन्ही प्रकारच्या प्रश्नावलीमुळे संशोधनाचा उद्देश सफल होईल आणि निष्कर्ष काढता येण्यास सुकर होईल.

२) विश्वसनीयता :- विश्वसनीयता याचा अर्थ उत्तरकर्त्यांच्या उत्तरामध्ये सातत्य असणे आवश्यक आहे. समजा संशोधकाने लोकसंख्या ही समस्या अभ्यासण्यासाठी घेतली आणि त्या लोकसंख्या वाढीची कारणे शोधण्यासाठी प्रश्न विचारला आणि त्याचे उत्तर देणाऱ्यांने तेच उत्तर दिले तर त्यात विश्वसनीयता असते. याउलट उत्तर देणाऱ्यांनी आपली उत्तरे



Scanned with OKEN Scanner

त्याच प्रश्नासाठी वेगवेगळ्या प्रकारे दिली तर संशोधन कार्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. त्यातून विश्वसनीयता आढळत नाही. म्हणून संशोधकाने प्रश्न विचारतांनाच त्याची उत्तरे देणारे एका ठराविक पद्धतीने प्रतिक्रिया देतील याची खात्री करून घ्यावी.

**३) अनुभवजन्यता :-** गृहीतकृत्ये हे अनुभवजन्य असले पाहिजे. म्हणजेच गृहीतकृत्याची किंवा त्यापासून काढलेल्या निष्कर्षाची प्रत्यक्ष अनुभवाद्वारे चाचणी घेता आली पाहिजे. उदा."गुन्हेगारी प्रवृत्तीचा संबंध पूर्वजन्मातील कर्माशी असतो" या गृहीतकृत्याची चाचणी अनुभवजन्य तथ्यांद्वारे होणे शक्य नाही. म्हणून हे गृहीतकृत्ये शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरत नाही. त्याचप्रमाणे गृहीतकृत्ये हे नैतिक मुल्यांवर आधारलेले असावे. प्रसिद्ध विचारवंतांच्या अनुभवजन्य तथ्यांच्या आधारावर केलेल्या विधानाला गृहीतकृत्ये असे म्हणता येणार नाही. उदा. "मालक कामगारांचे शोषण करतो." हे मार्क्सचे असणारे प्रसिद्ध वचन गृहीतकृत्य घेऊ शकत नाही. कारण मालक, कामगार, शोषण हे सर्व शब्द संदिग्ध आहेत. अनुभवाद्वारे चाचणी घेता येईल असेच गृहीतकृत्ये असले पाहिजे. त्याचप्रमाणे त्याला वैज्ञानिक आधार असला पाहिजे.

**४) प्राक्कथनाचे सामर्थ्य :-** भविष्यात काय घडू शकेल याचा अंदाज आणि भूतकाळात काय घडले असेल याचे अनुमान या दोन्हींचा समावेश प्राक्कथन या संज्ञेच्या संकल्पनेमध्ये होतो. सिद्धांत हा गृहीतकाचा आधार असेल तर त्या गृहीतकृत्यामध्ये प्राक्कथनाचे सामर्थ्य निर्माण होते. उदा. दरखिमने मांडलेल्या सिद्धांतानुसार आदिवासी समाजामध्ये आत्महत्येचे प्रमाण कमी असते, या गृहीतकृत्यामध्ये प्राक्कथनाचे सामर्थ आहे असे दिसून येते. थोडक्यात गृहितकृत्यामध्ये प्राक्कथनाचे सामर्थ्य असणे हे उपयुक्त गृहीतकृत्याचे एक प्रमुख वैशिष्ट्ये आहे. विशिष्ट काळात विशिष्ट घटना, प्रकार घडू शकेल तसाच तो भूतकाळात विशिष्ट प्रकारे घडला असावा असे सांगण्याचे सामर्थ्य गृहितकृत्यात असले पाहिजे.

**५) पर्यायी उत्तर: -** आदर्श गृहितकृत्य हे संशोधन समस्येचे सूचक उत्तर असते. एकाच समस्येच्या समाधानासाठी अनेक गृहितकृत्ये असू शकतात. त्या समस्येचे समाधान करू शकेल असा मुक्त दृष्टीकोन गृहितकृत्यात व्यक्त झालेला असावा. उदा. औद्योगिक संघर्षाच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठी आपण अनेक गृहितकृत्ये मांडू शकतो. परंतु "आर्थिक कारणांमुळे औद्योगिक संघर्ष निर्माण होतात" असे गृहितकृत्ये निर्माण केल्यास संशोधन समस्येचे सूचक किंवा पर्यायी उत्तर मिळू शकते.

**६) सत्यता :-** याचा अर्थ ज्या संशोधनाचा वापर आपण करणार आहोत त्यातून सत्यता निष्पन्न होते . उदा. बौद्धीक चाचणी वापरून बुध्यांक मोजता येतो.

**७) सामान्यीकरण :-** सामान्यीकरण याचा अर्थ संशोधनातील निष्कर्ष समाजातील मोठ्या गटांना लागू झाले पाहिजेत. जेव्हा संशोधक माहिती संकलन करतो, त्याची प्रक्रिया करतो, तेव्हा निघणारे निष्कर्ष निवडक गटापुरते असले तरीही त्या मोठ्या गटांना लागू पडणारे असले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) Ackoff R.L. - The Design of Social Research.
२) Kulkarni D.B. - Research Methodology : Methods & Techniques, New Age International Ltd., New Delhi.
३) आगलावे प्रदिप - संशोधन पद्धती-शास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, पुणे
४) घाटोळे आर. एन. - समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर
५) डॉ. जगताप, डॉ पवार, डॉ. पाटिल - अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती, प्रशांत पब्लीकेशन, जळगाव

-----------------------------*****-----------------------------



Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2020 Special Issue – 224 (A)

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS




**Guest Editor :**
Dr. Mrs. M. V. Waykole
Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Executive Editor :**
Dr. A. D. Goswami
Vice Principal,
Bhusawal Arts, Science and P.O. Nahata
Commerce College, Bhusawal, Dist Jalgaon.

**Chief Editor :**
Dr. Dhanraj T. Dhangar
(Yeola)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 36 | महात्मा गांधींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान | प्रा.एस.एस.तडवी | 115 |
| 37 | महात्मा गांधी व माओ-त्से-तुंग यांच्या राजकीय विचारांचे तुलनात्मक अध्ययन | रविंद्र माळी | 119 |
| 38 | महात्मा गांधींच्या विचारांतील राजकीय आध्यात्मीकरणातून समाजनिर्मिती | डॉ.राजेंद्र नाडेकर | 124 |
| 39 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महात्मा गांधींचे योगदान | प्रा. हनुमंत सरतापे | 128 |
| 40 | महात्मा गांधी आणि सत्याग्रह | पार्वती पाडवी | 131 |
| 41 | महात्मा गांधी यांचे आर्थिक विचार | प्रा. नागनाथ मनुरे व प्रा.किरणकुमार मनुरे | 136 |
| 42 | महात्मा गांधी यांचे धर्मनिरपेक्ष राजकीय विचार | प्रा.संदिप राजभोग | 139 |
| 43 | महात्मा गांधींचे शैक्षणिक तत्त्वज्ञान | प्रा. व्ही. बी. पाटील | 142 |
| 44 | महात्मा गांधी यांच्या विचारांचा मराठी वैचारिक साहित्यावर पडलेला प्रभाव | प्रा. डॉ. शुभांगी चव्हाण | 144 |
| 45 | महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार व वर्तमानकालीन सापेक्षता | प्रा.मंगला सूर्यवंशी | 147 |
| 46 | म. गांधीच्या राजकीय विचारांची प्रासंगिकता | प्रा.दिनेश खंडारे | 151 |
| 47 | जळगाव नगरपालिका आणि जळगाव जिल्ह्यावरील गांधी विचारधारेचा प्रभाव आणि भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान -एक ऐतिहासिक अभ्यास | प्रा. अरूण अवसरमल | 154 |
| 48 | महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार | भूपेंद्र बाणाईत | 159 |
| 49 | गांधी विचारांचा बारोमास मधील एकनाथवर पडलेला प्रभाव | डॉ.शकुंतला भारंबे | 163 |
| 50 | महात्मा गांधींचे शैक्षणिक विचार | डॉ. वंदना चौधरी | 165 |
| 51 | क्रौंचवध कादंबरील गांधी विचारांचा प्रभाव | डॉ. भारती बेंडाळे | 167 |
| 52 | महात्मा गांधींची सत्याग्रहाची संकल्पना | इंदिरा लोखंडे | 169 |
| 53 | महात्मा गांधींच्या ग्राम स्वाराज्याची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. वसंत पतंगे | 172 |
| 54 | महात्मा गांधींचे हिंदस्वराज्य व आजचा भारत | डॉ. कांतीलाल सोनवणे | 177 |
| 55 | महात्मा गांधी आणि राष्ट्रवाद | प्रा. शशिकांत पाटील | 180 |
| 56 | महात्मा गांधींचे शैक्षणिक तत्वज्ञान | कु.सोनाली पेकम | 186 |
| 57 | महात्मा गांधींच्या विचारांचे महत्त्व | डॉ.माधव वाघमारे | 189 |
| 58 | महात्मा गांधींच्या विचारातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी | डॉ. सतीश पारधी | 191 |
| 59 | सत्याग्रह : अन्यायाच्या प्रतिकाराचे शाश्वत साधन | प्रा.शरद सोनवणे | 194 |
| 60 | महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची समर्पकता | डॉ.अरुण पाटील | 198 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.*

- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी

**Published by –**

© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 224 (A) : Relevance of Gandhian Thoughts
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
February-2020

# महात्मा गांधींच्या आर्थिक विचारांची समर्पकता

प्रा. डॉ. अरुण उखा पाटील
(अर्थशास्त्र विभाग)
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि.नंदुरबार
मो. ९४२३९१९१२०.
Email - arunpatil927@gmail.com.

**गोषवारा -**

ॲडम स्मिथच्या मते संपत्तीचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र होय. मार्शलच्या मते, अर्थशास्त्र मनुष्याच्या त्या आर्थिक व्यवहारांचा अभ्यास करते, ज्यातून त्याला भौतिक कल्याण प्राप्त होते. तर गांधीजींच्या दृष्टीने अर्थशास्त्र जीवनाच्या सामाजिक, राजनैतिक आणि धार्मिक पैलुंनी युक्त आहे. नैतिकतेसंबंधीच्या भावना गांधीजींच्या आर्थिक विचारात महत्वपूर्ण आहेत. ॲडम स्मिथ, मार्शल यांना ज्या अर्थाने अर्थशास्त्रज्ञ म्हटले जाते त्या अर्थाने म.गांधी हे अर्थशास्त्रज्ञ नाहीत. म. गांधी यांनी अर्थशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ लिहीलेला नसला तरी देखिल त्यांनी निर्धन नागरीकांच्या सहाय्यतेसाठी एक व्यवहारिक, आर्थिक कार्यक्रम दिला आहे. त्यांच्या आर्थिक विचारांनी भारतीय अर्थशास्त्रावर व्यापक प्रभाव पाडला आहे.

गांधीजींच्या मते अर्थशास्त्र ज्यामुळे कोणी व्यक्ती किंवा राष्ट्राच्या नैतिकतेस धक्का पोहचत असेल तर ते शंभर वेळा त्याग करण्यासारखे आहे. खरे अर्थशास्त्र तर सामाजिक न्यायाचा स्वीकार करते, अतिदुर्बल व्यक्तीसह सर्वांचे समप्रमाणात कल्याण करू इच्छिते. समाजामध्ये संपत्तीचे जे विषम विभाजन आहे, त्याला म.गांधी एक सामाजिक समस्या मानत असत. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये संपत्तीचे थोड्या लोकांच्या हातात केंद्रीकरण होत असतांना त्याचवेळी लाखो लोक बेरोजगार असतील तर तो मोठा सामाजिक अपराध आहे, असे गांधीजी मानत. गांधीजी हे भौतिक साधनांच्या वापराविरोधात होते.

औद्योगिकीकरण, यांत्रिकीकरण याबाबत गांधीजींचा विरोध नव्हता तर गावातील लाखो कारागिरांना काम देण्याचे सामर्थ्य असणाऱ्या लहान लहान यंत्रांचे ते स्वागत करत असत. मोठमोठ्या कारखान्यात विपुल प्रमाणात मालाचे उत्पादन घेण्यापेक्षा देशातील गावागावांमध्ये, खेड्यांमध्ये, झोपड्यांमध्ये मालाचे उत्पादन घेणे योग्य ठरेल अशी त्यांची विचारसरणी होती. ज्यांच्यामध्ये काम करण्याची इच्छा आणि क्षमता आहे अशा प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम मिळावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या मते ग्रामोद्योग व कुटीर उद्योगांची कास धरल्याशिवाय रोजगाराचे ध्येय गाठता येणार नाही.

म. गांधी यांनी स्वदेशीला महत्वपूर्ण स्थान दिले आहे. आर्थिक व औद्योगिक जीवनात स्वदेशीपासून दूर गेल्यानेच मोठ्या प्रमाणात गरीबी वाढली आहे. गांधीजी म्हणतात की, "मला जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात सरकारचा हस्तक्षेप आवडत नाही. परंतु विदेशी वस्तुंवर जबर कर बसविला जाणे जास्त पसंत करेन. इंग्लंडने मुक्त व्यापार भारतावर थोपवून भारताचे मोठे नुकसान केले आहे." ज्या विदेशी वस्तुंच्या आयातीमुळे देशातील उद्योगांना हानी पोहोचण्याचा संभव आहे त्या सर्वांवर बहिष्कार घालणे हे गांधीजींचे अर्थशास्त्रीय सुत्र आहे. जी वस्तू स्वदेशात पुरेशा प्रमाणात निर्माण होऊ शकते ती वस्तू विदेशातून आयात करू नये.

खादी ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण, यांत्रिकीकरण, स्वयंपूर्ण खेड्याची संकल्पना, भाकरीसाठी श्रमाची संकल्पना, लोकसंख्या मर्यादीत ठेवण्याबाबत विचार, श्रमकल्याणाबाबतचे विचार, मर्यादीत गरजांबाबत विचार, आर्थिक विषमतेचे निर्मुलन, पंचायती राजव्यवस्था याबाबत म.गांधी यांनी आपली स्वतंत्र विचारधारा व्यक्त केलेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत मोठ्या प्रमाणात परिवर्तन झालेले आपणास पहावयास मिळत आहे. अलीकडे जागतिकीकरण स्वीकारलेल्या खुल्या अर्थव्यवस्थेला महत्व प्राप्त झालेले आहे. असे असले तरी आजही देशाच्या सर्वांगिण विकासासाठी म. गांधींच्या विचारांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. तसेच जगामध्ये आपले अस्तित्व टिकवायचे असेल, कल्याण साधायचे असेल तर गांधी विचारांपासून दूर जाता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

**प्रस्तावना -**

नुकत्याच गेल्या २ ऑक्टोबरला महात्मा गांधी यांची १५० वी जयंती मोठ्या उत्साहाने देशभरात साजरी करण्यात आली. त्या निमित्ताने आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या राष्ट्रीय अधिवेशनासाठी सदर विषयाची निवड झाल्याच्या निमित्ताने 'महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांची समर्पकता' या विषयावर लेख प्रस्तुत करीत आहे. महात्मा गांधी जरी अर्थशास्त्रज्ञ नसले तरी गांधीजींचे आर्थिक विचार हे अप्रगत, आर्थिक शोषण झालेल्या अर्थव्यवस्था विचारात घेऊन मांडलेले आहेत. या विचारांना विकसीत देश, विकसनशील देश, अशी देशाच्या आर्थिक स्थितीबाबत कोणतीही मर्यादा नाही. कोणत्याही वेळी आणि कोणत्याही स्थितीत गांधीजींचे विचार तेवढेच मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात.

**उद्देश -**

महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारांची देशाच्या आर्थिक विकासासाठी कशा प्रकारची गरज आहे आणि त्यांच्या अर्थशास्त्राचा कसा उपयोग करून घेता येईल या प्रमुख उद्देशाने सदर लेख सादर केला जात आहे.

**गृहीतके -**

१. महात्मा गांधी हे शास्त्रीयदृष्ट्या अर्थशास्त्रज्ञ नसून देखिल त्यांच्या विचारांनी भारतीय अर्थशास्त्रावर व्यापक प्रभाव पडलेला आहे.
२. गांधीजींची अर्थशास्त्रीय विचारधारा ही भारतीयांच्या आर्थिक जीवनात महत्वपूर्ण स्थान प्राप्त करते.
३. महात्मा गांधींचे अर्थशास्त्राबाबतचे विचार पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञांपेक्षा खूपच वेगळे आहेत.

सदर शोध निबंधात खादी उद्योग, उद्योगांचे विकेंद्रीकरण, यंत्रांचा वापर, आदर्श खेडी किंवा गाव, विश्वस्ताची संकल्पना, भाकरीचा प्रश्न, अन्नधान्याचा प्रश्न, लोकसंख्या, दारूबंदी, मर्यादीत गरजा, श्रमकल्याण इ. मुद्यांच्या बाबतीत महात्मा गांधींच्या विचारांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**खादी ग्रामोद्योगाबाबत विचार -**

प्रत्येक भारतीयाला वर्षभरात जवळपास १२ मिटर लांब म्हणजे १३ यार्ड कापड लागते. महात्मा गांधीजी नेहमी म्हणत की, 'कापड गिरण्या वाढविल्या म्हणजे कापडाच्या पुरवठ्याचा प्रश्न सुटेल असे नाही' म्हणून त्यांनी खादी उद्योगाच्या विकासावर भर दिला व २२ सप्टें. १९२५ ला त्यांनी 'अखिल भारतीय चरखा संघाची' स्थापना केली. त्यांच्या मते खादी हे मानवतेचे, आर्थिक स्वातंत्र्याचे आणि समानतेचे प्रतिक आहे. त्यातून उत्पादनाचे विकेंद्रीकरणही होते. म.गांधी दक्षिण आफ्रिकेतून भारतात परत आल्यानंतर त्यांनी खादी चळवळ सुरू केली. त्यांना विश्वास होता की, खादी उद्योग हा भारतातील कोट्यावधी लोकांना उपासमारीपासून वाचवू शकेल आणि गरिबांना यापासून पूरक असे उत्पन्न मिळेल. त्यामुळेच चरख्यावर सूत कातण्याचा सल्ला ते नेहमीच देत असत. त्याला कारण म्हणजे चरखा खरेदी करायला खूपच कमी पैसा लागत होता. तो वापरायला सोपा होता आणि स्थिर उत्पन्नाचा स्त्रोत होता. चरख्यावर काम करतांना कोणत्याही मोसमाचा त्यावर परिणाम होत नाही. चरखा हा बेरोजगारीचा प्रश्न सोडवायला मदत करतो. शिवाय ते अहिंसेचे प्रतिक आहे. त्या काळात गांधीजी नेहमी म्हणायचे 'स्वराज्य लेंगे, चरखा चलाके लेंगे'.

खादी उद्योगाच्या विकासाबाबत गांधीजींना पुढील मुद्दे अभिप्रेत होते.

१) कापडाच्या आयातीवर बंदी आणावी.
२) सर्व सरकारी कार्यालयात कापड आणि विणकाम उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी हातांनी विणलेल्या कापडाचा वापर करावा.
३) हातमागावर विणलेल्या कापडाच्या किंमती मिलच्या कापडाच्या किंमतीपेक्षा कमी असाव्यात.
४) कापड विणण्याचे काम बहुउद्देशीय सहकारी संस्थांमार्फतच करावे.
५) ज्या भागात कापूस उत्पादन केले जात नाही, त्या भागात कापूस पेरावा.



Scanned with OKEN Scanner



# INNOVATIVE PRACTICES IN TEACHING AND EVALUATION

- EDITORS -
Dr. M. S. Raghuwanshi | Dr. Kailas S. Chaudhari

Prashant

Scanned with OKEN Scanner

37. उच्च शिक्षणात नाविण्यपुर्ण माहिती संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारीत अध्यापन आणि मुल्यांकन शिक्षण ............... 117
आशिष गुलाबसिंग वसावे, मार्गदर्शक - प्राचार्य डॉ. संजय एस. शिंदे

38. उच्च शिक्षणात मूल्यांची भूमिका ............... 120
डॉ. के.एस.खैरनार (सहयोगी प्राध्यापक)

39. 'ज्ञान व अभ्यासक्रम' ह्या विषयासाठी सहयोग अध्यापन पध्दतीच्या परिणामकारकतेचा अभ्यास ............... 123
जयश्री शामकुवर शिंगाडे,

40. माहिती संप्रेषण तंत्रविज्ञान सहाय्यीत व पारंपारिक पध्दतीने अध्यापन करुन त्यांच्या परिणामकारतेचा तुलनात्मक अभ्यास ............... 126
प्रा.डॉ.डी.झेड.चौधरी

41. नंदुरबार जिल्ह्यातील उच्च शिक्षणात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनांचा अभ्यास (2002-2012) ............ 129
प्रा.डॉ. विजयसिंग आय. गिरासे

42. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या स्वयंअध्ययनात शैक्षणिक अॅन्ड्रॉईड अॅप प्रणाली वापरातील परिणामकारकतेचा अभ्यास. ............... 131
डॉ.के.आर.खोंडे, भूषण मनोहर गवांदे

43. उच्च शिक्षणातून वैश्विकभाव निर्माण करणे ............... 133
प्रा.डॉ. सौ. सुषमा प्रमोद पाटील

44. डिजिटल युगात ई-लर्निंग ............... 135
डॉ. युवराज वसंत पाटील

45. शिक्षणातील नवप्रवाह: SWOT चे विश्लेषण............... 138
डॉ. दीपा अनिल पाटील

46. उच्च शिक्षण अध्यापनातील नावीन्यपूर्ण पद्धती: ब्लॅकबोर्ड ऍक्टिव्हिटीत वर्गातील विद्यार्थ्यांचा सहभाग............. 141
प्रा.सुनिता काशिनाथ जगताप

47. मूल्यमापनाची साधने ............... 144
प्रा.डॉ. मोतीलाल सुकदेव उभाळे

48. अध्यापनात संगणक अप्लिकेशनचा वापर............... 147
प्रा.प्रताप भाऊसाहेब आत्रे

49. उच्च शिक्षणातील मूल्यमापनासाठी नाविण्यपूर्ण पद्धती............... 150
प्राचार्य डॉ. संजय शिंदे

50. मूल्यमापनात ICT वापराच्या सद्यस्थितीचा अभ्यास: यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मूक्त विद्यापीठ केस स्टडी........ 152
डॉ. कविता साळुंके, कु. ज्योती रामचंद्र लष्करी

51. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयाची सद्यस्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना ............... 154
प्रा. डॉ. सौ. विजया विठ्ठल बाविस्कर

52. अभिक्रमित अध्यापन पद्धती ............... 157
प्रा.संजय भिवाजी खिल्लारे

53. उच्च शिक्षणातील मूल्यमापनाचे समकालीन मार्गांचा अभ्यास ............... 159
डॉ. अरुण उखा पाटील

54. दृष्टीकोन सहकार्यात्मक अध्ययनाचा ............... 161
डॉ.अनिता मधुसूदन शेळके

55. उच्चशिक्षणाव्दारे सक्षमीकरण ............... 163
प्रा. सुनिता संतोष पवार




Scanned with OKEN Scanner

# उच्च शिक्षणातील मूल्यमापनाचे समकालीन मार्गांचा अभ्यास

**डॉ. अरुण उखा पाटील**
सहाय्यक प्राध्यापक,
विद्या विकास मंडळ संचलित कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि . नंदुरबार

**प्रस्तावना :**

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकास हा शाळा, महाविद्यालयातून होत असतो. विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्त्व विकासासाठी अनेक कार्यक्रम, उपक्रम, स्पर्धांचा उपयोग शिक्षक व महाविद्यालयाकडून केला जातो. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व अपेक्षेप्रमाणे आकार घेत आहे किंवा नाही? यांची शैक्षणिक प्रगती होत आहे किंवा नाही? असे अनेक प्रश्न शिक्षकांसमोर उभे राहत असतात. अशा वेळेस शिक्षकाला मूल्यमापनाची गरज भासत असते.

शिक्षक अध्यापन करीत असतांना विद्यार्थ्यांच्या अध्ययनाची स्थिती, अध्ययन निष्पत्ती, अध्यापनाची उद्दिष्ट साध्य झाली किंवा नाही याचीही पडताळणी शिक्षकाला करावे लागते . त्यासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन विद्यार्थ्यांचे केले जाते .यासाठी शिक्षक विविध साधनांचा व मार्गांचा वापर मूल्यमापनासाठी करीत असतो. अशा साधनांची माहिती घेणे हे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यासाठी मूल्यमापनाच्या विविध मार्गांचा अभ्यास प्रस्तुत विश्लेषणात्मक अभ्यासातून केलेला आहे.

**मूल्यमापनाचे मार्ग :**

विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रिया आणि कृती यांच्या आधारावर अनेक मार्ग मूल्यमापनासाठी वापरले जातात. अशा समकालीन मूल्यमापनाचे मार्ग पुढील प्रमाणे आहेत.

**१. तोंडी परीक्षा :**

प्रचिन काळापासून तोंडी परीक्षा तंत्राचा वापर शिक्षण प्रक्रियेत केला जात आहे. लेखी परीक्षा अस्तित्वात नसतांना गुरु तोंडी परीक्षेच्या साह्याने विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करत असत. अभ्यासलेल्या विषयात विद्यार्थ्यांची कितपत प्रगती झाली आहे ते तपासण्यासाठी तोंडी प्रश्नांचया अधारे मूल्यमापन केले जात असे. काही विषयांच्या मूल्यमापनासाठी तोंडी परीक्षेशिवाय पर्यायच नसतो. म्हणूनआजीही या तंत्राचा वापर मूल्यमपानात केला जातो. उदा. भाषा विषयातील कौशल्य संपादनाच्या मूल्यमापनासाठी या मार्गाचा वापर आजही मोठ्या प्रमाणात व तितक्याच प्रभावाने होतांना दिसतो.

**तोंडी परीक्षेची वैशिष्ट्ये :–**

१. लेखनाची सवय नसलेल्या मुलांच्या मूल्यमापनासाठी तोंडी परीक्षा मार्गाचा वापर केला जातो.
२. विद्यार्थी व शिक्षक हे दोघे समोरासमोर असतात. त्यामुळे मूल्यमापनासाठी प्रत्यक्ष निरीक्षण करता येते.
३. प्रश्न विचारुन विद्यार्थ्यांच्या आकलन क्षमता लक्षात येते.
४. विद्यार्थ्यांना बोलण्याची, विचार व्यक्त करण्याची, कल्पना मांडण्याची, विरोध प्रकट करण्याची संधी प्राप्त होते.

**२. लेखी परीक्षा :**

अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्याचे मूल्यमापन करण्यासाठी लेखी परीक्षेचा मार्ग जास्त प्रमाणात केला जातो. लेखी परीक्षा वेगवेगळ्या प्रकारच्या असतात. जसे घटक चाचणी, सहामाही परीक्षा व वार्षिक परीक्षा अशा विविध लेखी परीक्षा घेवून विद्यार्थ्यांच्या अध्ययनाचे मूल्यमापन केले जाते. लेखी परीक्षेत तीन प्रकारचे प्रश्न असतात. त्यात दीर्घोत्तरी किंवा निबंधवजा प्रश्न, लघुत्तरी प्रश्न आणि वस्तुनिष्ठ प्रश्न यांचा समावेश होतो. मूल्यमापनाचे अत्यंत महत्त्वाचा मार्ग म्हणून लेखी परीक्षेकडे पाहिले जाते.

**लेखी परीक्षेची वैशिष्ट्ये :–**

१. विद्यार्थ्यांचे आकलन क्षमता लक्षात येते
२. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती व कल्पनाशक्तीचा विकास लेखी परीक्षेमुळे करता येतो.
३. लेखी परीक्षेत विविध प्रकारचे प्रश्न विचारता येतात. जसे लघुत्तरी प्रश्न, दीघोत्तरी प्रश्न इ.
४. विद्यार्थ्यांची लेखन कौशल्य विकासास प्राधन्य मिळते.

**३. प्रात्यक्षिक परीक्षा :**

एखाद्या विषयातील कौशल्य विकासाच्या मूल्यमापनासाठी प्रात्यक्षिक परीक्षेचा वापर केला जातो. प्रात्यक्षिक परीक्षेचा वापर विविध कला, चित्रकला, संगीत, नृत्य, कागदकाम, मूर्तिकाम अशा विषयांमध्ये उपयुक्त ठरत असते. प्रात्यक्षिक परीक्षा ही प्रत्यक्ष कृतिवर आधारलेली असते. विद्यार्थ्यांनी करावयाची कृती व त्या कृतीतून निर्माण होणारी निष्पत्ती या दोन बाबी या परीक्षेत अंतर्भूत असतात.

**प्रात्याक्षिक परीक्षेचे वैशिष्ट्ये :–**

१. विद्यार्थ्यांला मिळालेल्या ज्ञानाचे उपयोजन करण्यासाठी प्रात्याक्षिक परीक्षा उपयोगी ठरत असतात.
२. विद्यार्थ्यांच्या कौशल्याचे मापन प्रात्यक्षिक परीक्षेव्दारे करता येते.
३. प्रात्यक्षिक परिक्षेत प्रत्यक्ष निरीक्षण करणे शक्य असते.
४. प्रात्यक्षिक परीक्षेमुळे कृतीतील अचूकता व सफाईदारपणा अचूक तपासता येतो.

**४. पुस्तकासह परीक्षा :**

विद्यार्थ्यांना पुस्तक वापराची सवय विकसित होण्याच्या दृष्टिने पुस्तकांच्या सहाय्याने परीक्षा ही संकल्पना उदयास आली



Scanned with OKEN Scanner

आहे. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुस्तकातून लिहिणे अपेक्षा पुस्तक सहाय्यित परीक्षेत असते. विद्यार्थ्यांच्या विकासाचे मूल्यमापन करतांना मूल्यमापनाच्या वेळी विद्यार्थ्यांना पुस्तके व तत्सम वापरण्याची परवानगी देणे यास पुस्तकासह परीक्षा असे म्हणतात.

**पुस्तकासह परीक्षेचे वैशिष्ट्ये :–**

१. पुस्तकासह परीक्षेमुळे विद्यार्थ्यांला मूल्यमापन हे अध्ययनापेक्षा वेगळे नाही याची जाणीव निर्माण होते.
२. परीक्षेची भिती व दडपण नाहिसे करता येते.
३. विद्यार्थ्यांला कमी वेळेत माहिती, अवतरणे, उदाहरणे, स्वत:चे मत मांडण्याची सवय लागते.
४. पुस्तकासह चाचणीतील प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना पाठ्यांश कसा समजून घ्यावा, पाठ्यांशातील मुख्य विचार, मध्यवर्ती कल्पना, गाभाभूत घटक कोणता हे कसे ओळखावे आणि थोडक्यात कसे अध्ययन करावे याबाबतची दृष्टि प्राप्त होते.

**समारोप :**

आधुनिक काळात कितीही महत्त्वाचे अध्यापन पद्धती विकसित झाल्यात तरी प्रचिन व समकालीन मूल्यमापनासाठी असलेले विविध मार्गांचे स्थान आजही कायम आहे. या विविध मार्गांनी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन आजही उच्च शिक्षणात मोठ्या प्रमाणात केले जात आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. अध्ययनासाठी मूल्यनिर्धारण – डॉ . शैलजा भंगाळे व डॉ. पिंगला धांडे
२. शैक्षणिक मूल्यमापन – चा.प. कदम
३. मापन आणि मूल्यमापन – चौगुले एस. एस.



Scanned with OKEN Scanner

Volume - 10 (Issue - 6)

April, 2020

ISSN - 2230 - 9578

# Journal of Research and Development

## A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR

5.13



**Editor : Dr. R.V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102
Email - info@jrdrb.com     Visit - www.jrdrvb.com

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 19 | डॉ. शरद मधुकर कुलकर्णी | जागतिक शांतता व सुरक्षितता | 69-71 |
| 20 | आशिष गुलाबसिंग वसावे<br>प्राचार्य डॉ. संजय एस. शिंदे | भाषिक कौशल्ये व त्यांचा विकास | 72-76 |
| 21 | डॉ. राजेंद्र बाविस्कर | रांगेय राघव के 'घरौंदे' उपन्यास में सामाजिक यथार्थता | 77-79 |
| 22 | डॉ.महादेव सदाशिव डिसले | शिक्षक-शिक्षण कार्यक्रमांतर्गतील प्रशिक्षणार्थीची डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारधाराविषयक अभिरुची - एक अभ्यास | 80-82 |
| 23 | डॉ. विजय जी. गुरव | विनोद रस्तोगी के नाटकों में सामाजिक चेतना | 83-86 |
| 24 | प्रा.डॉ. अरुण उखा पाटील | नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदान | 87-89 |
| 25 | प्रा.डॉ.राहुल पुरुषोत्तम मेघे | भारतातील साम्राज्य विस्तारात ब्रिटिश लष्करी व्यवस्थेची भूमिका | 90-93 |
| 26 | प्रा.डॉ. अनिल विठ्ठल बाविस्कर | महाराज सयाजीराव गायकवाड यांचे सामाजिक सुधारणांविषयीचे विचार | 94-97 |
| 27 | प्रा.डॉ. व्ही.बी. माळी | जैविक धोका आणि मानवी सुरक्षा | 98-101 |
| 28 | प्रा. सुनिता संतोष पवार | स्त्री चळवळ | 102-103 |
| 29 | प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव कापुस्ते | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता | 104-106 |
| 30 | प्रा.डॉ. सुनिल व्ही. फुवर | नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बालकांमधील कुपोषण - एक समस्या | 107-110 |
| 31 | प्रा.डॉ. राजधर चैत्राम बेडसे | निरामय व दीर्घायुषी जीवन जगण्यात समतोल आहार व शरीरश्रमाचे महत्त्व | 111-113 |
| 32 | प्रा.डॉ. संजय राजधर महाले | आंबेडकरवादी कवी : डॉ. यशवंत मनोहर | 114-119 |
| 33 | प्रा.साळवे कल्पना सुदास | संशोधनाचे स्वरूप, व्याप्ती व टप्पे | 120-124 |
| 34 | प्रा. डॉ. प्रतिभा दीपक सूर्यवंशी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | 125-127 |
| 35 | अर्चना अ. वणीकर | संशोधन अहवाल : मूल्यमापन आणि निकष | 128-130 |
| 36 | प्रा. सुभाष लक्ष्मण भालेराव | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'स्वराज्य' या बद्दलचे विचार | 131-133 |
| 37 | प्रा.डॉ.सौ. विजया विठ्ठल बाविस्कर | आनंदी जीवनाचे मुलभूत आधार | 134-136 |
| 38 | प्रा. धिरज अविनाश शेलार | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील धुळे विभागाच्या कर्मचारी कल्याण योजनांचा / उपक्रमांचा अभ्यास | 137-140 |




Scanned with OKEN Scanner

Journal of Research & Development
Vol. 10 (Issue 6) April 2020, (ISSN-2230-9578)
COSMOS IMPACT FACTOR - 5.13

# नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदान

प्रा.डॉ. अरुण उखा पाटील (अर्थशास्त्र)
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा जि.नंदुरबार

- **प्रस्तावना :-**

नंदुरबार जिल्हा हा कृषीप्रधान जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात ८५ टक्के लोकांचे उपजीविकेचे साधन शेती हेच आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जिल्ह्याच्या कृषी व्यवसायात अनेक बदल झाले. जिल्ह्यातील ३,२८,६७३ क्षेत्र हेक्टर जमिनीवर तृणधान्ये, कडधान्ये व इतर प्रमुख अन्नधान्ये पिकविली जातात. तर १,०५,८०६ क्षेत्र हेक्टर जमीन वनाखाली आहे. ४० टक्के जमीन हलक्या प्रतीची व ३५ टक्के जमीन मध्यम प्रतीची आहे. जिल्ह्याचे हवामान कोरडे असून हलक्या प्रतीची जमीन, पावसावर अवलंबून असलेली पिकपध्दती या बाबी शेतीची उत्पादकता कमी असण्यास कारणीभूत आहेत. मध्यम प्रकारची जमीन जलसिंचनासाठी उपयुक्त आहे. सिंचनात वाढ व्हावी यासाठी जिल्ह्यात सिंचन प्रकल्प राबविण्यात आलेले आहेत. बिगर सिंचन क्षेत्रात मृद व जलसंधारणासाठी पाणलोट क्षेत्र अभियान राबविण्यात येत आहेत.

अर्थात या शेती विकासाच्या प्रक्रियेत कृषीसाठी लागणाऱ्या कर्जाची मागणीही वाढत गेली. ही वाढती मागणी पुरविण्यासाठी सहकारी वित्तपुरवठ्यात वाढ करण्याशिवाय पर्याय नव्हता. यात त्रिस्तरीय यंत्रणेमार्फत केल्या जाणाऱ्या वित्त पुरवठ्यात जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण राहिले आहे. या पतसंस्थांची जिल्ह्यात झालेली वाढ व प्रगती त्यांच्या कार्यावरून लक्षात येते.

- **संशोधनाचा उद्देश -**

१) नंदुरबार जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे अध्ययन करणे.
२) नंदुरबार जिल्ह्याच्या कृषी विकासात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे योगदानाचे अध्ययन करणे.

- **माहिती संकलन -**

अध्ययनासाठी निवड केलेल्या विषयाचे खरे स्वरूप माहित करून घेण्यासाठी त्याचप्रमाणे वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढता यावेत यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित तथ्य संकलित करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा आधार घेतला जाणार नाही.

- **प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांमार्फत वित्तपुरवठा -**

सन १९६०-६१ ते २०१०-११ या कालखंडात पूर्वीचा धुळे जिल्हा व आत्ताच्या नवनिर्मित नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांच्या विकासाचा आढावा घेता जिल्ह्यात या संस्थांच्या संख्येत फारशी भर पडली नाही. मात्र कार्याचा विस्तार वाढल्याचे दिसून येते.

**नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचा विकास व कार्य**

| अ. क्र. | तपशील | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एकूण संस्था | ७६४ | ६६९ | ५९९ | ७२८ | ३०१ | ३०२ |
| २ | सभासद संख्या (हजारात) | ३७ | १३५ | २२२ | २३९ | १४४ | १९८ |
| ३ | भागभांडवल (रू.हजारात) | २८८५४.१३ | १०५२९६.२४ | १७३१५३.८३ | १८६४१३.३६ | ११२३७.६ | १४११५१ |
| ४ | राखीव निधी (रू.हजारात) | १५२७४ | ५५७३२ | ४११०१ | ६०६४८ | २५०७६ | १८५८२० |
| ५ | खेळते भांडवल (लाख रू.) | ३२८ | १७७२ | ० | २६८७६ | ५४१५ | ८५७ |
| ६ | दिलेली कर्जे (लाख रू.) | २५६ | ५२२ | १०१ | १८५ | २८६ | ६११ |
| ७ | वसूली | ४७ | ३२ | १५ | ११० | १४७ | ६७६ |
| ८ | येणे (रू.हजारात) | ३०४ | ५८५ | १७१ | २१० | ३७६ | ६५० |
| ९ | थकबाकी (रू. लाखात) | २०१ | ४१० | ०१४ | ०६५ | १३१ | ६२७ |

स्त्रोत - जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सहकारी संस्था, नंदुरबार

वरील तक्त्यावरून नंदुरबार जिल्ह्यात ३०२ प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था आहेत. १९६०-६१ मध्ये तत्कालिन धुळे जिल्ह्यात ७६४ संस्था होत्या. १९८०-८१ मध्ये संस्थांच्या संख्येत घट होऊन १९९०-९१ मध्ये ७२८ पर्यंत त्यात वाढ झाली. नंदुरबार जिल्ह्याच्या निर्मितीनंतर सन २०००-०१ ते २०१०-११ या कालावधीत संस्थांच्या संख्येत केवळ एकने वाढ झाली. मात्र जिल्ह्यातील संस्थांची सभासद संख्या, भाग भांडवल, राखीव निधी आणि कर्जवाटप यात जिल्हा निर्मितीनंतरच्या काळात वाढ झाली. खेळत्या भांडवलात मात्र जिल्ह्यात सन २०००-०१ ते २०१०-११ या कालावधीत ५,४९५ लाख रूपयांवरून ८५७ लाख रूपयांपर्यंत घट झाली. उपरोक्त काळात जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांनी केलेल्या कर्जपुरवठ्यात २८६ लाख रूपयांवरुन ६९९ लाख रुपयांपर्यंत वाढ झाल्याचे दिसून येते. परंतु दिलेल्या कर्जाची वेळेवर वसूली करणे या संस्थांना शक्य झाले नाही. त्यामुळे येणे कर्जात आणि थकबाकीत वाढ होत गेली. सन २०१०-११ अखेर या संस्थांचे येणे कर्ज आणि थकबाकीची रक्कम अनुक्रमे ६५० हजार रूपये आणि ६२७ हजार रुपये पर्यंत वाढली. थोडक्यात ऑगस्ट १९९८ नंतर नवनिर्मित नंदुरबार जिल्ह्यात संस्थांची संख्या वाढली नसली तरी सभासद संख्या, भाग भांडवल, राखीव निधी, कर्ज वाटप यात वाढ झाली. मात्र वसूली आणि थकबाकी यामुळे खेळत्या भांडवलात घट झाली.

- **नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे कर्जदार व दिलेले कर्ज -**

नंदुरबार जिल्ह्यातील कृषी कर्जासाठी स्थापन झालेल्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था अर्थात कृषी सहकारी सोसायट्यांचे कर्जदार आणि या कर्जदार सभासदांना वाटप करण्यात आलेल्या कर्जाची तालुकानिहाय स्थिती पुढील तक्त्या वरील माहितीवरून अभ्यासता येईल.

**नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांचे कर्जदार व दिलेल्या कर्जाची तालुका निहाय स्थिती**

**(सन २००१-०२ ते २०१०-११) (रूपये हजारात)**

| अ. न. | तालुका | २००१-०२ | | | २००५-०६ | | | २०१०-११ | | | उपरोक्त काळातील वाढ / घट % | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कर्जदार | कर्जाची रक्कम | प्रती कर्जदार सरासरी कर्ज | कर्जदार | कर्जाची रक्कम | प्रती कर्जदार सरासरी कर्ज | कर्जदार | कर्जाची रक्कम | प्रती कर्जदार सरासरी कर्ज | कर्जदार | कर्जाची रक्कम | प्रती कर्जदार सरासरी कर्ज |
| १) | अक्कलकुवा | १३०१ | ३७४७ | २.८८ | ८७८८ | ३२५४४ | ३.७० | ३५१५ | ४९७७ | १.४१ | १७०.१७ | ३२.८२ | -५१.०४ |
| २) | धडगांव | १५५८ | १६७७ | १.०७ | १४०२ | ४८६० | ३.४६ | १८५३ | ५९५३ | ३.२१ | १८.९३ | २५४.९७ | २००.०० |
| ३) | तळोदा | २०५५ | २३२५५ | ११.३१ | ५१६३ | ४७३०४ | ९.१६ | ८३८२ | ५०८७५ | ६.०६ | ३०७.८८ | ११८.७७ | -४६.४१ |
| ४) | शहादा | २२४२५ | १८८४४३ | ८.४० | ८५२९ | २२३४९९ | २६.२० | १४६३५ | ३४६८३१ | २३.६९ | -३४.७३ | ८४.०५ | १८२.०२ |
| ५) | नंदुरबार | ६३६० | ४७११२ | ७.४० | ७६१८ | १००३८२ | १३.१७ | १९७१६ | १६६९१२ | ८.४६ | २१०.०० | २५४.६० | १४.३२ |
| ६) | नवापूर | ५८५२ | २३३२६ | ३.९८ | ९७९८ | ६८७५८ | ८.८५ | ८७४२ | १०३६१५ | ११.८५ | ४९.३८ | ३४४.२० | १९७.७३ |
| ७) | एकूण जिल्हा | ३९५५१ | २८७५४० | ७.२७ | ४१२९८ | ४७७३४७ | ११.५५ | ५६८४३ | ६७९२४३ | ११.९४ | ४३.७२ | १३६.२२ | ६४.२३ |

टिप - जिल्ह्यातील तळोदा, शहादा व नंदुरबार तालुक्यातील आकडेवारी ही विविध कार्यकारी व आदिवासी विविध कार्यकारी प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था मिळून आहे.

स्त्रोत - जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नंदुरबार जिल्हा - वार्षिक अहवाल - २०००-०१ ते २०१०-११

उपरोक्त तक्त्यावरील माहितीवरून दिसून येते की, सन २००१-२००२ मध्ये नंदुरबार जिल्ह्यात एकूण ३९,५५१ हजार कर्जदार होते. सन २०१०-११ मध्ये ही संख्या ५६,८४३ हजार झाली. उपरोक्त कालावधीत ही वाढ ४३.७२ टक्के दर्शविते. जिल्ह्यातील तालुकानिहाय कर्जदारांची संख्या व त्यात होणारी वाढ यात तफावत असल्याचे दिसून येते. शहादा तालुक्यात कर्जदारांचे प्रमाण सर्वात जास्त तर अक्कलकुवा तालुक्यात ते सगळ्यात कमी आहे. उपरोक्त काळात कर्जदारांच्या संख्येत झालेली वाढ सगळ्यात जास्त तळोदा तालुक्यात ३०७.८८ टक्के एवढी आहे. तर सगळ्यात कमी वाढ धडगांव तालुक्यात १८.९३ टक्के आहे. २०१०-११ मध्ये शहादा तालुक्यात कर्जदारांची संख्या जिल्ह्यात सर्वात जास्त असली तरी उपरोक्त कालावधीत कर्जदारांच्या संख्येत ३४.७३ टक्के घट झालेली आहे. कर्जदारांच्या संख्येत झालेली वाढ उर्वरित अक्कलकुवा, नंदुरबार व नवापूर तालुक्यात अनुक्रमे १७०.१७, २१०.०० व ४९.३८ टक्के एवढी आहे.

सन २००१-०२ मध्ये जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी वित्तसंस्थांनी एकूण २,८४,५४० हजार रूपयांचा कर्जपुरवठा केला होता. सन २०१०-११ मध्ये हे प्रमाण ६,७९,२४३ हजार झाले. ही वाढ १३६.२२ टक्के एवढी झाली.



Scanned with OKEN Scanner

जिल्ह्यात तालुकानिहाय केलेल्या कर्ज वाटपात तफावत असल्याचे दिसून येते. उपरोक्त कालावधीत तालुकानिहाय केलेल्या कर्जवाटपात झालेली वाढ नवापूर तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे ३४४.२० टक्के तर सर्वात कमी वाढ अक्कलकुवा तालुक्यात म्हणजे ३२.८२ टक्के एवढी आहे. नंदुरबार व धडगाव तालुक्यात जिल्हा पातळीवरील वाढीपेक्षा कर्जवाटपात झालेल्या वाढीचे प्रमाण जास्त आहे तर तळोदा आणि शहादा तालुक्यात कर्ज वाटपातील वाढीचे प्रमाण जिल्हा पातळीवरील वाढीच्या प्रमाणापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

सन २००१-०२ ते २०१०-११ या कालावधीत जिल्ह्यात शेतकऱ्यांना पतसंस्थांकडून करण्यात आलेल्या सरासरी कर्जवाटपाच्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. २००१-०२ मध्ये जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सरासरी ७२७० रूपये कर्ज मिळाले तर २०१०-११ मध्ये ते ११९४० रूपये झाले. उपरोक्त काळात ही वाढ ६४.२३ टक्के असल्याचे दिसून येते. जिल्ह्यातील तालुकानिहाय स्थितीचा विचार करता अक्कलकुवा आणि तळोदा वगळता उर्वरित चार तालुक्यात शेतकऱ्यांना मिळालेल्या सरासरी कर्जात वाढ झाल्याचे दिसून येते. धडगांव तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २०० टक्के तर सर्वात कमी वाढ नंदुरबार तालुक्यात म्हणजे १४.३२ टक्के सरासरी कर्जात वाढ झाली आहे. शहादा व नवापूर तालुक्यात सरासरी कर्जात झालेली वाढ अनुक्रमे १८२.०२ व १९७.७३ टक्के असल्याचे दिसून येते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून दरवर्षी उत्पादन खर्चानुसार पीक कर्जाचे दर ठरविले जातात व थोड्याफार प्रमाणात वाढ केली जाते. त्यामुळे जिल्ह्यात सरासरी कर्जाच्या रकमेत वाढ झाल्याचे दिसून येते. पीक कर्जाच्या दरात पीकनिहाय तफावत केलेली असते. केळी, ऊस, कापूर, फळबाग या पीकांचे दर इतर पीकांच्या तुलनेने जास्त असतात. वेगवेगळया तालुक्यात तेथील सिंचन सुविधा, जमिनीची प्रत यानुसार वेगवेगळी पीके घेतली जातात. पीक लागवडीच्या क्षेत्रात तफावत असल्यामुळे कर्जवाटपाच्या प्रमाणात तालुकानिहाय तफावत असल्याचे दिसून येते.

- **निष्कर्ष -**

निष्कर्षत: वरील माहितीवरून असे दिसून येते की, नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थांकडून कर्ज घेणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे. तसेच या संस्थांकडून केल्या जाणाऱ्या एकूण कर्जपुरवठ्यात व सरासरी कर्जाच्या रकमेतही वाढ होत आहे. परंतु जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यात झालेली वाढ ही सारख्या प्रमाणात नाही. एकंदरीत संस्थांकडून केला जाणारा सरासरी कर्जपुरवठा अतिशय कमी असल्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांची कर्जाची गरज पूर्ण होत नाही. अलिकडे राष्ट्रीयकृत बँकांमार्फत शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वितरण काही प्रमाणात जिल्ह्यातील काही बँकांमार्फत केले जात आहे. असे असले तरी कृषी वित्त पुरवठ्यात राष्ट्रीयीकृत बँकांचा सहभाग वाढतांना दिसून येत असला तरी अजूनही ग्रामीण भागात सहकारी वित्तपुरवठा केल्याशिवाय ग्रामीण शेतकऱ्यांच्या वित्त पुरवठ्याची भूक भागविली जात नाही. यावरून अजूनही सहकारी वित्तपुरवठ्याचे योगदान जिल्ह्याच्या कृषी विकासात महत्त्वपूर्ण राहिलेले आहे, यात प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था अर्थात आदिवासी व बिगर आदिवासी विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांचा सिंहाचा वाटा आहे, हे नाकारून चालणार नाही.

- **संदर्भ ग्रंथ -**

१) निरगुडे आय.ए. - 'भारतीय बँकींग क्षेत्र'- अर्थसंवाद भारतीय अर्थव्यवस्था, विशेषांक, एप्रिल-जून २०१२, पृ.७८-७९.
२) Annual Report- NABARD- २००८-०९ and २०११-१२ P.No.६४ and ३४.
३) वार्षिक कर्ज योजना -२०१२-२०१३ अग्रणी बँक नंदुरबार, पा.नं.६६.
४) महाराष्ट्राची आर्थिक पहाणी - २०१२-१३ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग- महाराष्ट्र शासन मुंबई पा.नं.९०-९१.
५) जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, नंदुरबार जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई २०००-२००१, २०११-१२
६) धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., वार्षिक अहवाल २०१०-११, पृ.क्र.१४

----------------------------*****------------------------------



Scanned with OKEN Scanner